


दैनिक
# राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com




बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-३०४ | बुधवार, दि.२६ फेब्रुवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने- ६ | किंमत ३ रूपये

# सरकार सोयाबीनची खरेदी सोडून विक्रीच्या मागे लागले

## शेतकरी दुहेरी संकटात, नाफेडने विक्री केल्यास भाव आणखी पडणार

मुंबई । प्रतिनिधी

सरकारने यंदा २० लाख टनांच्या दरम्यान सोयाबीनची हमीभावाने खरेदी केली. खरेदी केलेल्या सोयाबीनची विक्री ३ मार्चपासून बाजारात करणार असल्याचे नाफेडने म्हटले आहे. आधीच बाजारात सोयाबीनचे भाव पडलेले आहेत. त्यातच नाफेडने खुल्या बाजारात सोयाबीनची विक्री केल्यास भाव आणखी पडतील. त्यामुळे सोयाबीनची विक्री सरकारने १५ जुलैनंतर करावी, अशी मागणी सोयाबीन प्रोसेसर्स असोसिएशन ऑफ इंडियाने केली आहे. दरम्यान, सरकारच्या या धोरणामुळे शेतकरी दुहेरी संकटात सापडणार आहे.

सोयाबीन प्रोसेसर्स असोसिएशन ऑफ इंडिया अर्थात सोपाने केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्याकडे ही मागणी केली. सोपाने म्हटले आहे की, सोयाबीनचे भाव आणखी पडल्यास शेतकरी पुढील हंगामात सोयाबीनची लागवड कमी करतील. त्यामुळे सोयाबीनचे भाव कमी होतील, असा कोणताही निर्णय सरकारने घेऊ नये. सोयाबीनची विक्री सरकारने उशीरा करावी, अशी मागणी सोपाने केली. हंगामाच्या सुरुवातीपासूनच सोयाबीनला हमीभावापेक्षा किमान ९०० ते एक हजार रुपये कमी भाव मिळत आहे. सरकारने हमीभावाने पान २ वर

### मार्च नाही जुलैमध्ये विक्री करा

सोपाने कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांना विनंती केली की, सरकारने खरेदी केलेले सोयाबीन १५ जुलैनंतर बाजारात विकावे. या काळात शेतकऱ्यांकडे सोयाबीन नसते. तसेच खरिपातील सोयाबीनची पेरणीही जवळपास आटोपलेली असेल. त्यामुळे पेरणीवर याचा जास्त परिणाम होणार नाही. त्यामुळे सरकारने सोयाबीनची विक्री मार्च महिन्यात न करता जुलै महिन्यात करावी, अशी मागणी सोपाने केली आहे.



# बारामती, बीडला प्रत्येकी ५६४ कोटी

## फडणवीस सरकारचे ७ महत्त्वाचे निर्णय

मुंबई । प्रतिनिधी

राज्य मंत्रिमंडळाची आज मंत्रालयामध्ये बैठक पार पडली. या बैठकीमध्ये सात महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. मुख्यमंत्री सचिवालयाने या निर्णयांची माहिती जारी केली आहे. आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयांमध्ये दोन नवीन पशुवैद्यक पदवी महाविद्यालयांना मंजुरी देण्याबरोबरच एका बँकेसंदर्भात मोठा निर्णय घेण्यात आला आहे.



मुख्यमंत्री सचिवालयातील जनसंपर्क कक्षाने मंगळवारी दिनांत २५ फेब्रुवारी २०२५ रोजी झालेल्या बैठकीमधील निर्णयांचा संक्षिप्त आढावा घेणारी सात निर्णयांची यादी जारी केली आहे. यामध्ये वित्त विभागाने सार्वजनिक उपक्रम, महामंडळांना ठाणे जनता सहकारी पान २ वर

# सरकारी नौकरदारांची होळीपुर्वीच दिवाळी

## महागाई भत्त्यात ३ टक्के वाढ; राज्य सरकारी १७ लाख कर्मचाऱ्यांना फायदा





मुंबई । प्रतिनिधी

राज्य सरकारच्या नौकरदारांची होळीपुर्वीच दिवाळी होणार आहे. कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात ३ टक्के वाढ झाली असून राज्यातील १७ लाख सरकारी कर्मचाऱ्यांना याचा थेट फायदा होणार आहे. फेब्रुवारी महिन्याच्या वेतनात हा फरक अदा करण्यात येणार आहे. कर्मचारी-शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांकडे गेले ३ महिने राज्यातील महायुती शासन दुर्लक्ष करीत असल्याची भावना सर्वदूर महाराष्ट्रातील राज्य कर्मचारी-शिक्षकांमध्ये दृढ होऊ लागल्याने नाराजी पसरली होती.

राज्यातील १७ लाख सरकारी कर्मचाऱ्यांच्या पान २ वर

### कर्मचाऱ्यांना असा होणार लाभ

७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशींप्रमाणे,केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्यात ३ टक्के वाढ होणार आहे. परंतु, त्यापूर्वीच महाराष्ट्र सरकारने राज्य कर्मचाऱ्यांना आनंदाची बातमी दिली आहे. राज्य सरकारी कर्मचारी आणि इतर पात्र पूर्णकालिक कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय महागाई भत्त्याच्या दरात सुधारणा करण्याचा प्रश्न राज्य सरकारच्या विचाराधीन होता. राज्य सरकारच्या २५ फेब्रुवारीच्या निर्णयानुसार १ जुलै, २०२४ पासून ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनसंरचनेतील मूळ वेतनावरील अनुज्ञेय महागाई भत्त्याचा दर ५० टक्क्यांवरुन ५३ टक्के करण्यात आला आहे. या महागाई भत्ता वाढ १ जुलै २०२४ ते ३१ जानेवारी २०२५ या कालावधीतील थकबाकीसह माहे फेब्रुवारी २०२५ च्या वेतनासोबत रोखीने देण्यात यावा, असे आदेश देण्यात आले आहेत.

# आज महाशिवरात्री; परळीत उसळणार शिवभक्तांचा महासागर

## प्रभू वैद्यनाथ सर्वांचं भलं करोत; महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त धनंजय मुंडे यांनी दिल्या शुभेच्छा

परळी वै.। प्रतिनिधी

परळी स्थित प्रभु वैद्यनाथ हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे ज्योतिर्लिंग असून, शिवपुराणात वैद्य नाथ या अर्थाने या पाचव्या ज्योतिर्लिंगास अनन्यसाधारण महत्त्व आहे. बुधवार, दि. २६ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्री असल्याने परळीत शिवभक्तांचा महासागर उसळणार आहे. महाशिवरात्रीचे पवित्र पर्व हे सर्व शिवभक्तांच्या आयुष्यामध्ये उत्तम आयुरारोग्य व समृद्धी घेऊन येवो, प्रभू वैद्यनाथ सर्वांचं भलं करो, अशी प्रार्थना राज्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांनी केली आहे.

महाशिवरात्रीच्या निमित्ताने दरवर्षी लाखो भाविक देशभरातून परळी नगरीत दाखल होऊन दर्शन घेत असतात. याही वर्षी लाखो भाविक परळी नगरीत दाखल होताना दिसत असून धनंजय मुंडे यांनी सर्व शिवभक्तांचे पान २ वर



### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२२ फेब्रुवारी २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १३०.०० क्विंटल | २,८०२ | ३,३५८ | ३,२११ |
| ज्वारी/हायब्रिड: १३६.००क्विंटल | १,८०० | ३,६५० | २,४०४ |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | २,२०१ | २,२०१ | २,२०१ |
| तूर : ४३.५० क्विंटल | ७,००१ | ७,३८१ | ७,१७१ |
| उडीद : ७.५० क्विंटल | ५,१०० | ५,१०० | ५,१०० |
| बाजरी: ११.०० क्विंटल | २,३०० | ३,३०४ | २,८४३ |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन: ७.०० क्विंटल | ३,६०० | ४,००० | ३,८४३ |
| हरभरा:५.५० क्विंटल | ५,२६० | ५,३०० | ५,२८० |

## इंद्रजित सावंतांना धमकी देणाऱ्या प्रशांत कोरटकरविरोधात गुन्हा दाखल

कोल्हापूर । प्रतिनिधी

इतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांना धमकी देणारी कथित ऑडिओ क्लिप व्हायरल झाली होती. या क्लिपनंतर प्रशांत कोरटकर नावाच्या व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जुना राजवाडा पोलीस ठाण्यात प्रशांत कोरटकरांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रशांत कोरटकर याने छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजीराजे यांच्याबाबत आक्षेपार्ह विधान करत सावंत यांना जीवे मारण्याची धमकी दिली होती.

प्रशांत कोरटकर नावाच्या व्यक्तीने इंद्रजित सावंत यांना फोन करून छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराज यांच्याबद्दल तुम्ही चुकीचे रेफरन्स दिले, असे म्हणत कोरटकर याने सावंत यांनी शिवीगाळ केली आणि धमकी दिली होती. 'तुला घरात येऊन मारेल, हा फायनल कॉल आहे' असे म्हणत सावंत यांना धमकी दिली होती. एवढेच नाहीतर छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजीराजे पान २ वर

# न्यायासाठी मस्साजोगकरांचे अन्नत्याग आंदोलन

## ..तर तुम्ही १४४ लावा नाही तर १४५ लावा-मनोज जरांगे

केज । प्रतिनिधी

सरपंच संतोष देशमुख खून प्रकरणातील आरोपी कृष्णा आंधळे यास अटक करण्यासह इतर महत्वाच्या मागण्यासाठी मस्साजोगच्या ग्रामस्थांनी अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. दरम्यान मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मस्साजोग येथे ग्रामस्थांची भेट घेत राज्य सरकारला कडक इशारा दिला आहे. तुम्ही १४४ लावा नाहीतर १४५ लावा, तुमच्या हातात सत्ता आल्यावर तुम्ही लोकशाही मारून टाकली का? असा सवाल मनोज जरांगे पाटील यांनी यावेळी केला आहे. तसेच मुख्यमंत्र्यांनी दिलेला शब्द पाळला असता तर अर्धे जेल भरले असते, असेही ते म्हणाले.

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली आहे. या घटनेनंतर राज्यात वातावरण चांगलेच तापले आहे. या घटनेला आता दोन महिन्यांहून अधिक काळ झाला आहे, मात्र तरी देखील आरोपींना अद्याप शिक्षा झालेली नाही, तसेच या प्रकरणातील एक आरोपी कृष्णा आंधळे अजूनही फरार आहे. या सर्व पार्श्वभूमीवर पान २ वर

### आ. संदिप क्षीरसागरांनीही घेतली भेट

मस्साजोग येथे ग्रामस्थांनी अन्नत्याग आंदोलन करण्यात येत असून आ. संदिप क्षीरसागर यांनी आंदोलनस्थळी जावून देशमुख कुटुंबाची भेट घेतली. तसेच आंदोलनाची प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी केली. तसेच आ. क्षीरसागर यांनी खा. सुप्रिया सुळे यांच्याशी फोनवर ग्रामस्थांचे बोलणे करुन दिले.

### उद्यापासून पाणीही बंद करणार-धनंजय देशमुख

फरार कृष्णा आंधळेला अटक करण्यासह आमच्या ७ मागण्या असून शासनाने त्या पुर्ण केल्या नाही तर दि. २७ फेब्रुवारीपासून आंदोलनकर्ते पाणी सुध्दा घेणार नसल्याचे धनंजय देशमुख यांनी सांगितले.

# कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क हटवा नसता आंदोलन-राजू शेट्टी

सोलापूर । प्रतिनिधी

केंद्र सरकारने कांदा निर्यातीवर २० टक्के शुल्क लावलेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची कोंडी होत आहे. त्यामुळे केंद्र सरकारने कांद्यावरील निर्यात शुल्क तातडीने हटवावे, अशी मागणी राजू शेट्टी यांनी नाशिकमध्ये मंगळवारी (दि.२४) केली आहे. या विषयावर स्वाभिमानी शेतकरी संघटनेने आक्रमक भूमिका घेतली आहे.

शेट्टी म्हणाले, शेतकऱ्यांची भिकाऱ्याशी तुलना करण्यापेक्षा कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क रद्द करा. सरकारने कांदा जास्तीत जास्त निर्यात पान २ वर



# अब्दुल सत्तार यांच्या कारभाराची चौकशी करण्यासाठी समिती स्थापन

मुंबई । प्रतिनिधी

**शिंदे सरकारच्या काळातील कृषी व पणन मंत्री अब्दुल सत्तार यांचा कारभार महायुती सरकारच्या रडारवर आला आहे. हमीभावाने शेतमाल खरेदीसाठीच्या केंद्रांना मान्यता देताना झालेली पैशांची मागणी, नियमबाह्य पद्धतीने निकषाबाहेरील संस्थांना मान्यता देणे अशा तक्रारी आल्याने त्यांची चौकशी करतानाच शेतमाल खरेदीच्या नोडल एजन्सीचे धोरण ठरवण्यासाठी सहा सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे.**

शेतमालाच्या खरेदीसाठी केंद्र सरकारकडून पंतप्रधान आशा योजना राबविली जाते. या किमान आधारभूत योजना अंतर्गत एकूण कृषी उत्पादनाच्या २५ टक्के उत्पादन हमीभावाने खरेदी केली जाते. त्यासाठी केंद्र सरकारच्या नाफेड व एनसीसीएफ या दोन संस्थांकडून राज्यस्तरीय नोडल संस्थांमार्फत खरेदी प्रक्रिया राबविली जाते. हमीभावाने शेतमालाची खरेदी करताना काही राज्यस्तरीय पान २ वर



# पैसे न दिल्याने कामे अडवली; केज बीडीओंविरोधात ग्रामस्थांचे उपोषण




## न्यायासाठी पिंपळगव्हाणकर पोहचले थेट विभागीय आयुक्त कार्यालयात

केज । प्रतिनिधी

**टेबला खालून दिल्याशिवाय जनतेची कामे सरकारी कार्यालयात होतच नाहीत, याचा अनुभव केज तालुक्यातील जनतेला सध्या येत आहे. लक्ष्मी दर्शन न झाल्याने केज गटविकास अधिकारी समृध्दी दिवाणे यांनी रोहयोची कामे अडवल्याचा प्रकार समोर आला आहे. याविरोधात एका सरपंचाने गावकऱ्यांना सोबत घेऊन चक्क विभागीय आयुक्त कार्यालयासमोर उपोषण सुरु केले आहे. त्यामुळे विभागीय आयुक्तांसह जि. प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी हे याची दखल घेतात का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

केज तालुक्यातील पिंपळगव्हाण ग्रामपंचायत अंतर्गत रोहयोच्या माध्यमातून काही वैयक्तिक तर काही सार्वजनिक कामांचे प्रस्ताव मंजुरीसाठी केज गटविकास अधिकारी कार्यालयाकडे पाठवले. मात्र लक्ष्मीदर्शन न झाल्याने तीन कर्मचाऱ्यांना हाताशी धरुन बीडीओ समृध्दी दिवाणे यांनी कामांना मंजुरी दिली नाही. उलट आमच्या प्रस्तावाच्या मागून आलेल्यांना मंजुरी देण्यात आली. पिंपळगव्हाण येथील सिंचन विहीर, गायगोठा, सार्वजनिक शौचालय यासह इतर कामांचे प्रस्ताव पैसे न दिल्याने अडवून धरल्याचे सरपंच गायकवाड यांचे म्हणणे आहे. सध्या केज पंचायत समितीला प्रभारी गट विकास अधिकारी समृध्दी दिवाणे आहेत त्या त्यांनी पंचायत समितीच्या गट विकास अधिकारी पदाचा पदभार घेतल्यापासून त्या विविध कारणांमुळे चर्चेत आहेत. महत्वाचे म्हणजे त्यांनी मलिदा गोळा करण्यासाठी दोन ग्रामसेवक व एक रोहयोचा अभियंता असे तीन कर्मचारी ठेवले असल्याचे सरपंच सचिन गायकवाड यांनी तक्रारीत म्हटले आहे. हे तिघे जण लोकांची कामे आडवून त्यांच्याकडे पैशाची मागणी करतात व लाभार्थी यांनी दिलेले पैसे ते गटविकास अधिकारी यांना देतात. जे सरपंच लक्ष्मीदर्शन देतात, त्यांची कामे तात्काळ होतात मात्र पिंपळगव्हाणच्या विकास कामांच्या प्रस्तावाकडे जाणिवपुर्वक दुर्लक्ष करण्यात येत आहे. रोहयोअंतर्गत विकास कामे झाली तर गावचा विकास होईल, यासाठी आम्ही प्रस्ताव मंजूर करण्यासाठी धडपड करीत असताना जाणिवपुर्वक बीडीओ यांच्याकडून त्रास देत असल्याचे गायकवाड यांनी म्हटले आहे. पान २ वर

### पैसे दिले तरच होतात कामे

गटविकास अधिकारी कार्यालयात सध्या कोणाचेही काम पैसे दिल्याशिवाय होत नसल्याची चर्चा आहे. टेबला खालून दिल्यावरच कर्मचारी कोणत्याही कामाची फाईल पुढे सरकवत असल्याचा अनुभव अनेक सरपंचांना आलेला आहे. त्यामुळे गटविकास अधिकारी कार्यालयात पैसे मागणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना कोणी तरी धडा शिकवण्याची गरज असल्याची मागणी जनतेतून होऊ लागली आहे.

## अग्रलेख

# नीलमताईंची आगळीक महाराष्ट्राला कमीपणा आणणारी

दिल्लीतील मराठी साहित्य संमेलन कोणत्याही मोठ्या वादाविना समाप्त होण्याच्या अवस्थेत असतानाच, समारोपाच्या टप्प्यात एका वेगळ्याच मुद्द्याने प्रचंड मोठे वादंग माजले. विधान परिषदेच्या उपसभापती आणि शिंदे सेनेच्या नेत्या नीलम गोऱ्हे यांनी तेथील एका परिसंवादात बोलताना या वादंगाला जन्म दिला. त्यांच्या म्हणण्याचा थेट मतितार्थ असा होता की, ठाकरे यांच्या शिवसेनेत पक्षप्रमुखांना मर्सिडीज गाडी दिल्याशिवाय कोणालाही मोठे पद मिळत नाही. दोन मर्सिडीज गाड्या दिल्या की एक मोठे पद तेथे मिळते, असे नीलम ताई म्हणाल्या आहेत. आता हे त्यांचे विधान खरे की खोटे हा वेगळा मुद्दा असेल, पण साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर आपण अशी व्यक्तिगत राजकीय हिशेबाची वक्तव्य करावीत का, हा मुद्दा महत्त्वाचा आहे. त्यांनी हे वक्तव्य अयोग्य व्यासपीठावर करून निश्चितच चूक केली आहे. या व्यासपीठावर अन्य राजकीय पक्षांच्या नेत्यांनाही स्थान दिले गेले होते, पण तेथे त्यांच्यापैकी कोणी फार वादग्रस्त राजकीय वक्तव्य करून आपला राजकीय हिशेब चुकता करण्याचा प्रयत्न केला नव्हता, पण ती आगळीक मात्र नीलमताईंनी केली.

दिल्लीतील या मराठी साहित्य संमेलनाचे महत्त्व फार मोठे होते, देशाच्या राजधानीत मराठी भाषेची पताका उंचावून धरण्याचे काम या संमेलनाने केले, तेथे अशा राजकीय मानसिकतेतून कोणीही कसलीही वक्तव्य करणे अपेक्षित नव्हते. परंतु तरीही नीलमताईंनी ही आगळीक केल्यानंतर त्यांना ठाकरे सेनेचे नेते खासदार संजय राऊत यांनी अतिशय आक्रमक प्रत्युत्तर दिले असून, नीलमताईंचा त्यांनी खरपूस समाचारच घेतला. काही वेळा नीलमताई यांचा एकेरी उल्लेख करत, ही विकृत मानसिकतेची बाई आहे अशी टिप्पणीही संजय राऊत यांनी केली. त्यावर पत्रकारांनी तुमच्या विरोधात हक्कभंग येऊ शकतो असे विधान करताच राऊत यांनी त्या पत्रकारालाही उडवून लावले. नुसते हक्कभंग नव्हे तर आम्ही ईडी सीबीआय आणि त्यांच्याकडून झालेली अटकही सोसून बाहेर पडलो आहोत, त्यामुळे असल्या हक्कभंगाला आपण किंमत देत नाही, अशा शब्दांत त्यांनी आपला राग व्यक्त केला. संजय राऊत केवळ नीलमताईंवरच तोंडसुख घेऊन थांबले नाहीत, तर त्यांनी साहित्य महामंडळाच्या प्रमुख उषा तांबे यांनाही चांगलेच फैलावर घेतले. साहित्य संमेलनाच्या व्यासपीठाचा असा राजकीय गैरवापर होऊ दिल्याबद्दल उषा तांबे यांनी माफी मागावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. एवढेच नव्हे तर स्वागताध्यक्ष म्हणून शरद पवार यांनीही नीलमताईंच्या वक्तव्याचा निषेध केला पाहिजे अशी मागणी राऊत यांनी केली. जेव्हा पवारांचा कोणी अपमान करतो त्यावेळी आम्ही त्यांच्या बाजूने बोलतो, मग आता पवारांनीही आमची बाजू उचलून धरत नीलमताईंच्या वक्तव्याचा निषेध करावा अशी मागणी राऊत यांनी केली. प्रतिक्रियेतून राऊत यांनी या वादाला व्यापक स्वरूप दिले आहे. उषा तांबे, शरद पवार आणि संयोजकांनाही त्यांनी या वादात ओढले आहे. दिल्लीतल्या संमेलनात विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांना व्यासपीठावर संधी दिली गेली मग ठाकरे गटाच्या नेत्यांना का डावलले हा आक्षेपही त्यांनी तेथे नोंदवला. त्यामुळे नीलमताई यांच्या वक्तव्यावरून सुरू झालेला वाद आता इतक्यात थांबेल अशी शक्यता नाही.

मुळात साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर राजकारण्यांना संधी द्यावी का, हा महाराष्ट्रात खूप वर्षांपासून चघळला गेलेला विषय आहे. त्यावर सर्व ज्येष्ठ साहित्यिक आणि सर्व दिग्गज नेत्यांनी यापूर्वीच आपापली मते व्यक्त केली आहेत. पण नीलम गोऱ्हे यांच्यासारख्यांचे वक्तव्य ऐकल्यानंतर संमेलनाच्या व्यासपीठावर राजकारण्यांना स्थान देऊच नका असे निक्षून सांगण्याची वेळ आली आहे, एवढे मात्र नक्की. या सगळ्या वादाच्या पार्श्वभूमीवर खुद्द नीलमताईंनी थोडी सारवासारव करण्याचा प्रयत्न केला. माझे वक्तव्य स्वानुभवावर आधारित आहे, बोलण्याच्या ओघात मी ते केले, असे सांगून त्यांनी त्यावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला, पण त्यातही त्यांनी 'स्वानुभव' असा शब्द वापरल्याने हा वाद इतक्यात संपण्याची शक्यता नाही. कारण शिवसेनेत पक्षप्रमुखांना मर्सिडीज दिल्यावरच पदे मिळतात या विधानाच्या पुष्ट्यर्थ स्वानुभव असा शब्दप्रयोग वापरून नीलमताईंनी आपला दावा अधोरेखितच करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यावर राऊत यांचे म्हणणे असे की, नीलमताईंना शिवसेनेने चार वेळा विधानपरिषद दिली मग नीलम गोऱ्हे यांच्या वक्तव्यानुसार त्यांनी चार दुणे आठ मर्सिडीज गाड्या शिवसेनेच्या नेत्यांना दिल्या असल्या पाहिजेत, कुठे आहेत त्या गाड्यांच्या पावत्या असा आव्हानात्मक सवालही राऊत यांनी केला. ज्या परिसंवादात नीलमताईंनी हे वक्तव्य केले, त्या परिसंवादाचे नाव 'असे घडलो आम्ही' असे होते. म्हणजे नेत्यांची हुजुरी करूनच महाराष्ट्रात राजकीय नेतृत्व घडत असते असे अधोरेखित करण्याचा प्रयत्न नीलमताई यांनी केला आहे, असा निष्कर्ष यातून काढला जाईल. दिल्लीतील साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर अशा स्वरूपाची वक्तव्य महाराष्ट्राला कमीपणा आणणारी आहेत, नीलमताईंनी हे लक्षात घ्यायला हवे होते.

# रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडीया (आठवले) दिव्यांग आघाडी बीड जिल्हाध्यक्षपदी शाहू डोळस यांची निवड

**बीड । पतिनिधी**

रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडीया (आठवले) माध्यमातुन बीड जिल्ह्यात गेल्या तिस वर्षापासून बीड जिल्ह्यात निराधार, अत्याचारीत, पीडीत दिव्यांग महिला तसेच चळवळी मध्ये कार्यरत राहुन आनेक आंदोलने करून दिन दलीत महीला तसेच दिव्यांग बांधवांना न्याय मिळवुन देण्याची धडपड पाहून त्यांनी केलेले सामाजीक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य व चळवळीत कार्यरत आसतांना दिन दलीत, निराधार, शोषीत पिडीतांना न्याय देण्यासाठी गेल्या तिस वर्षापासूनचा अविरत संघर्ष याची दखल घेवुन रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडीयाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजीक न्याय राज्य मंत्री मा. ना. रामदासजी आठवले साहेबांच्या आदेशावरून युवक रिपाई महाराष्ट्र अध्यक्ष पप्पुजी कागदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली



रिपब्लीकन पार्टी च्या दिव्यांग आघाडीचे प्रदेश अध्यक्ष मा. सुरेशजी माने पाटील यांनी शाहू नारायण डोळस रा. चऱ्हाटा, ता.जि.बीड यांची बीड जिल्हा रिपब्लीकन पक्षाच्या दिव्यांग आघाडीच्या बीड जिल्हा अध्यक्षपदी निवड केली. या निवडीचे नियुक्तीपत्र रिपब्लीकन पक्षाच्या जिल्हा मध्यवर्ती कार्यालयामध्ये युवक रिपाई महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष मा. पप्पुजी कागदे साहेब, रिपब्लीकन पक्षाच्या दिव्यांग आघाडीचे प्रदेश अध्यक्ष मा. सुरेशजी माने पाटील यांच्या हस्ते शाहूराव डोळस यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. यावेळी रिपाई जिल्हा सरचिटणीस राजुजी जोगदंड रिपाई बीड तालुका अध्यक्ष किसन तांगडे रिपाई गेवराई ता. अध्यक्ष किशोर कांडेकर, युविक रिपाई बीड तालूका अध्यक्ष सुभाष तांगडे, माजी सरपंच नागेश शिंदे, रिपाई शहर अध्यक्ष अविनाश जोगदंड, रिपाई पिंपळनेर सर्कल अध्यक्ष सतिष शिनगारे, आप्पा मिसळे, राहुल कोरडे, बाबुराव भालेराव, विजय साबळे, दिलीप ससाने, भागवत साबळे, श्रीरंग वाघमारे, प्रकाश ससाने, राजाभाऊ शिंदे, प्रविण सोनवणे, नानासाहेब धन्वे, संजय शिंदे, नितीन शिंदे, सुंदर वाघमारे, नितीन सोनवणे आदींची उपस्थीती होती. सर्व स्तरातून शाहू डोळस यांच्या अभिनंदन होत असून, पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# केंद्रीय मुख्याध्यापिका शारदा मुंडे यांचा सेवापुर्ती सोहळा



**कळंब । प्रतिनिधी**

**केंद्रीय मुख्याध्यापिका शारदा मुंडे-लाटे यांचा सेवापूर्ती समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमास माझ्यासह अखिल भारतीय वारकरी संप्रदायाचे राष्ट्रीय अध्यक्ष ह.भ.प.प्रकाश बोधले महाराज डिकसळच्या सरपंच लक्ष्मी नानासाहेब धाकतोडे, राष्ट्रीय प्राथमिक शिक्षक संघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष बाळकृष्ण तांबारे , हृदयरोगतज्ज्ञ डॉ.एल.जी.जाधवर ,उद्योजक विठ्ठल माने, शिक्षण विस्तार अधिकारी सुशील फुलारी, उपसरपंच हरिभाऊ कुंभार, पत्रकार सतीश टोणगे, साहित्य परिषद अध्यक्ष परमेश्वर पालकर , बालरोगतज्ज्ञ डॉ.रमेश जाधवर, संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष ॲड.तानाजी चौधरी, धनराज जाधवर, महादेव खराटे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.**

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शारदा लाटे यांच्या कन्या डॉ.संजीवनी जाधवर यांनी केले. सूत्रसंचालन उपक्रमशील शिक्षक महादेव खराटे यांनी तर आभार डॉ. ऋषिकेश जाधवर यांनी मानले. या समारंभास लाटे परिवार, मित्रपरिवार आणि स्वप्ननगरी रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या भावनिक आणि सन्मानपूर्वक कार्यक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# ग्रामीण भागातील स्मशानभूमींचा कायापालट करणार –भाऊसाहेब घुगे

**जालना । प्रतिनिधी**

**ग्रामीण भागात जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून देण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना कटिबद्ध असून जिल्हा नियोजन मंडळासह विविध योजनांतून स्मशानभूमींचा कायापालट केला जाईल. अशी माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी दिली.**

उज्जैनपुरी ता. बदनापुर येथे मागासवर्गीय समाज स्मशानभूमीचे भूमिपूजन भाऊसाहेब घुगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सरपंच संतोष चोरमारे ,माजी सरपंच रामनाथ वाघ ,रामेश्वर शिंदे ,कल्याण चोरमारे, अमोल दळे ,रामू दराडे ,बाजीराव शिंदे, अण्णासाहेब शिंदे, सुखदेव चोरमारे, सुदाम शिंदे ,बाळू शिंदे ,मनोज शिंदे ,दादाराव शिंदे, बाबासाहेब महाराज शिंदे ,कृष्णा चोरमारे ,अंशीराम वाघ ,ज्ञानेश्वर वाढेकर ,रुस्तुम खरात ,दामु जाधव, रामू तोतरे ,बापू शिंदे ,गजानन शिंदे, दादाराव शिंदे, स्वप्निल वाघ यांच्यासह ग्रामस्थांची उपस्थिती होती.

जिल्हा नियोजन समितीतून स्मशानभूमीसाठी पाच लक्ष रुपये मंजूर केले असून आ. अर्जुनराव खोतकर , आ. नारायण कुचे यांच्या सहकार्यातून शासनाकडे पाठपुरावा करून हिंदू समाजाच्या स्मशानभूमींचे



सुशोभीकरण आणि धनगर समाज स्मशानभूमी शेड साठी येणाऱ्या महिनाभरातच जिल्हा नियोजन समितीतून निधी मंजूर केला जाईल. तथापि ग्रामस्थांनी जागा उपलब्ध करून दिल्यास दोन्ही समाजाच्या स्मशानभूमीचा प्रश्न मार्गी लागेल. असा विश्वास ही भाऊसाहेब घुगे यांनी व्यक्त केला.

# ऊसतोड कामगारांचा आवाज तालुका अधिकाऱ्यांसमोर दणाणला...

## घनसावंगीत मराठवाडा ग्रामीण विकास संस्थेकडून ऊसतोड कामगार संवाद मेळावा सपन्न

**घनसावंगी । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील परतूर व घनसावंगी तालुक्यातील ऊसतोड कामगार प्रकल्पा अंतर्गत दि २५ रोजी मराठवाडा ग्रामीण विकास संस्थेकडून एकूण ६ गावातील सामाजिक अंकेक्षण कार्यक्रम घनसावंगी व परतूर तालुक्यातील अधिकाऱ्यांनसमोर सपन्न झाला दरम्यान सामाजिक अंकेक्षण माहितीच्या आधारावर हा संवाद मेळावा आयोजित करण्यात आला होता यावेळी घनसावंगी तालुक्यातील तालुका वैद्यकीय अधिकारी अविनाश गायकवाड,गटशिक्षणाधिकारी रवींद्र जोशी,बालविकास प्रकल्प अधिकारी विनोद डाबेराव,विस्तार अधिकारी प्रेम खिल्लारे आदी प्रमुख अधिकाऱ्यांची



यावेळी उपस्थिती होती. दरम्यान यावेळी संस्थेचे संचालक अप्पासाहेब उगले यांनी सामाजिक अंकेक्षणचे महत्व व शासनाच्या विविध योजना व सुविधा बाबत सविस्तर माहिती दिली व उपस्थित शासकीय यंत्रणासोबत ऊसतोड कामगार यांनी आपल्या समस्या व उपाययोजना बाबत संवाद साधावा व या व्यासपीठाचा उपयोग करून घ्यावा याबाबत मत व्यक्त केले संबंधित आरोग्य, परिपोषण व शिक्षण याविषयावर प्रशासकीय यंत्रणा व ऊसतोड कामगार यांच्यात संवाद पार पडला यावेळी ऊसतोड कामगारांनी आपल्या गावात असणाऱ्या समस्यांचा पाढा यावेळी वाचला यावर प्रभावीपणे या कामगारांची प्रश्न कसे सोडवले जातील यावर तालुक्यातील सर्व अधिकाऱ्यांनी ऊसतोड कामगारांसोबत संवाद केला यावेळी संस्थेचे व्यवस्थापक योगेश मुक्कावार यांनी ऊसतोड कामगार प्रकल्प उद्देश व प्रस्तावना सादर केली व कार्यक्रमाच्या शेवटी एकनाथ राऊत यांनी एकल महिला व महिला व बाल विकास योजना याबाबत माहिती दिली तर संस्थेचे राजेश वाघमारे,अजय गाढे यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गावं स्वयंसेवक योगेश आढे,महादेव खरात,आकाश चौघुले,सुरेखा वाघमारे यांनी परिश्रम घेतले.

## पान १वरून...

### सरकार सोयाबीनची खरेदी

२० लाख टन खरेदी करूनही सोयाबीनचे भाव वाढले नाहीत. त्यामुळे शेतकरी अडचणीत आले आहेत. त्यातच सरकारने खरेदी केलेले सोयाबीन विक्रीसाठी काढले तर त्याचा परिणाम दरावर होणार आहे. सरकारने पूर्ण सोयाबीन खरेदी न करताच खरेदी बंद केली. त्यामुळे आजही अनेक शेतकऱ्यांकडे सोयाबीन पडून आहे. शेतकरी सोयाबीनचे भाव वाढण्याची वाट पाहत आहेत. सध्या सोयाबीन ३ हजार ७०० ते ४ हजार १०० रुपयाने विकले जात आहे. यात सरकारने सोयाबीन विक्रीसाठी काढले तर बाजारात भाव आणखी कमी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मार्चपासून भाव आणखी कमी झाल्यास शेतकरी येणाऱ्या खरिप हंगामात सोयाबीनची लागवड कमी करतील, अशी भीती सोपाने व्यक्त केली आहे.

----------

### सरकारी नौकरदारांची

दृष्टीने आनंदाची बातमी आहे. राज्य सरकारी कर्मचाऱ्याच्या महागाई भत्त्यात ३ टक्के वाढ करण्यात आली आहे. महागाई भत्ता हाता ५० टक्क्यांहून आता ५३ टक्के पोहचला आहे. येत्या १ जुलै २०२४ पासून हा वाढीव महागाई भत्ता लागू होणार आहे. जुलै २०२४ थकबाकी या महिन्याच्या अखेरी पगारात जमा होणार आहे. या सरकारच्या निर्णयाचा फटका १७ लाख सरकारी कर्मचाऱ्यांना फायदा होणार आहे. या निर्णयाचा अंमलबजावणी सुरु झाली असून फेब्रुवारी महिन्यात कर्मचाऱ्यांना हा वाढीव पगार होणार आहे. त्यामुळे होळीपुर्वीच राज्य कर्मचाऱ्यांची दिवाळी साजरी होणार आहे.

--------------

### बारामती, बीडला

बँकेत खाती उघडण्यास परवानगी देण्याच्या महत्त्वाच्या निर्णयाचाही समावेश आहे. याशिवाय पाटबंधारे प्रकल्पाने बाधित पुनर्वसित गावांसाठी मोठी आर्थिक मदत देण्याचा निर्णयही जाहीर करण्यात आला आहे.

**मंत्रिमंडळाच्या आजच्या बैठकीमध्ये कोणते निर्णय झाले हे संक्षिप्त स्वरुपात पाहूयात...**

१) पौड, ता. मुळशी, जिल्हा पुणे येथे लिंक कोर्टऐवजी दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग या न्यायालयाची स्थापना करण्यास मान्यता.

**(विधी व न्याय विभाग)**

२) ठाणे जनता सहकारी बँकेत सार्वजनिक उपक्रम, महामंडळे यांना खाते उघडण्यासाठी परवानगी

**(वित्त विभाग)**

३) १९७६ पूर्वीच्या पाटबंधारे प्रकल्पाने बाधित पुनर्वसित गावठाणांमध्ये नागरी सुविधा पुरवण्यासाठी प्रलंबित कामांचा कृती कार्यक्रम राबविण्याचा निर्णय; अशा ३३२ गावठाणासाठी ५९९.७५ कोटी रुपये मंजूर

**(मदत व पुनर्वसन विभाग)**

४) महाराष्ट्र राज्य आधारसामग्री (डेटा) धोरणास मान्यता; राज्य डेटा प्राधिकरण स्थापन करणार. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली नियामक समिती.

**(नियोजन विभाग)**

५) बारामती जिल्हा पुणे येथे नवीन पशुवैद्यक पदवी महाविद्यालय स्थापन करण्यास मंजुरी. यासाठी ५६४.५८ कोटी रुपये मंजूर

**(कृषि व पदुम विभाग)**

६) परळी, जिल्हा बीड येथे नवीन पशुवैद्यक पदवी महाविद्यालय स्थापन करण्यास मंजुरी. यासाठी ५६४.५८ कोटी रुपये मंजूर

**(कृषि व पदुम विभाग)**

७) महाराष्ट्र महामार्ग अधिनियम कलम १८(३) १९५५ मध्ये सुधारणा, तसेच महाराष्ट्र महामार्ग अध्यादेश २०२५ ला मान्यता

(सार्वजनिक बांधकाम विभाग)

----------

### न्यायासाठी मस्साजोगकरांचे

आता मस्साजोगच्या ग्रामस्थांनी अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. दरम्यान मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील हे देखील मस्साजोगच्या दौऱ्यावर आहेत. यावेळी बोलताना त्यांनी पुन्हा एकदा सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. तुम्ही १४४ लावा नाहीतर १४५ लावा, तुमच्या हातात सत्ता आल्यावर तुम्ही लोकशाही मारून टाकली का? असा सवाल मनोज जरांगे पाटील यांनी यावेळी केला आहे. तसेच मुख्यमंत्र्यांनी दिलेला शब्द पाळला असता तर अर्धे जेल भरले असते, असेही ते म्हणाले.

-------------

### इंद्रजित सावंतांना धमकी देणाऱ्या

यांच्याबद्दल कोरटकर याने अत्यंत खालच्या शब्दांत भाष्य केले. इंद्रजित सावंत यांनी जुना राजवाडा पोलीस ठाण्यात जाऊन प्रशांत कोरटकरांच्या विरोधात तक्रार दाखल केली. सावंत यांच्या तक्रारीच्या आधारे जातीय तेढ, धार्मिक भावना, महापुरुषांचा अवमान आशा कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एकूण सहा कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. दरम्यान, याबाबत बोलताना इंद्रजीत सावंत म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराज आणि मराठा समाज यांच्याबाबत आक्षेपार्ह विधान या कोरटकर नावाच्या व्यक्तीने केले होते. याबाबत माझ्या फोनमधील रेकॉर्डिंग मी पोलिसांना दिले आहेत. तसेच इन्स्टाग्रामवर देखील या व्यक्तीने माझ्याविरोधात आक्षेपार्ह विधान केले होते. याद्वारे त्याने जातीजातीत तेढ निर्माण होणारे विधान केले आहेत. तसेच शिवाजी महाराजांसारख्या महापुरुषांबाबत अपमानजनक वक्तव्य केल्याने या व्यक्तीवर गुन्हा दाखल करावा म्हणून मी आत्ता पोलिसांकडे तक्रार दिलेली आहे. ते पुढे म्हणाले, शिवाजी महाराजांची आणि मराठ्यांची अस्मिता माझ्यासाठी महत्वाची असून याविरोधातच मी फक्त तक्रार दिली आहे. यानंतर कोरटकर नावाच्या या व्यक्तीवर नुसता गुन्हा दाखल करुन उपयोग नाही तर त्याच्यावर कारवाई देखील झाली पाहिजे. कारण महाराष्ट्रात शिवाजी महाराजांबाबत गेल्या तीन-चार वर्षापासून विविध विधाने येत आहेत. त्यांच्यावर काहीच कारवाई होत नाही. त्यामुळे अशा निर्लज्ज माणसांची महाराष्ट्रात राहुन, खालच्या पातळीवर जाऊन बोलण्याची काही जणांची हिंमत झाली आहे. त्यामुळे सरकारने यावर तातडीने कडक कारवाई केली पाहिजे असे इंद्रजीत सावंत म्हणाले.

-----------

### आज महाशिवरात्री; परळीत

प्रभुवैद्यनाथांच्या परळी नगरीत स्वागत करत असल्याचे म्हटले आहे.

महाशिवरात्री महोत्सवाच्या निमित्ताने दरवर्षी धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेच्या वतीने फराळ व फळे वाटपासह यात्रा महोत्सवात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. याही वर्षी नात प्रतिष्ठानच्यावतीने यात्रा महोत्सवात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून त्याचाही लाभ भाविकांनी घ्यावा असे आवाहनही धनंजय मुंडे यांनी केले आहे. दर्शनासाठी आलेल्या भाविकांना विविध सुविधा, पार्किंग, वाहतूक, स्वच्छ पिण्याचे पाणी यांसह विविध सुविधांच्या अनुषंगाने धनंजय मुंडे यांनी नगर परिषद, तहसील व पोलीस प्रशासनास योग्य सूचना देखील केल्या आहेत.

-----------

### अब्दुल सत्तार यांच्या कारभाराची चौकशी

नोडल संस्थांनी विविध शेतमाल उत्पादक कंपन्यांना खरेदी केंद्र सुरु करण्याची परवानगी देण्याच्या बदल्यात पैशांची मागणी केली. तसेच केंद्रातील खरेदी प्रक्रियेचा मोबदला अडवून त्यासाठीही पैसे मागितले गेले. शिवाय, खरेदी केंद्रामध्ये बेकायदेशीर पद्धतीने पैशाची कपात करणे, काही नोडल संस्थांच्या संचालक मंडळात एकाच कुटुंबातील एकापेक्षा जास्त व्यक्तींचा समावेश करण्यासारखे गैरप्रकार केले गेले. या सर्व तक्रारींच्या पार्श्वभूमीवर राज्यस्तरीय नोडल संस्था नेमण्याची कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी सात सदस्यीय समिती नेमण्याचा निर्णय पणन विभागाने घेतला आहे. राज्यस्तरीय नोडल एजन्सी नेमताना एक सर्वसमावेशक निकष किंवा कार्यप्रणाली अवलंबविणे आवश्यक आहे. त्यामुळे अभ्यास करुन सर्वसमावेशक धोरण आणि कार्यप्रणाली निश्चित करण्याबाबत सरकारला शिफारस करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघाच्या व्यवस्थापकीय संचालकांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीवर नाफेडचे राज्यप्रमुख, राज्याचे पणन संचालक, पणन मंडळाचे कार्यकारी संचालक, पणन महासंघाचे सरव्यवस्थापक आणि सेवानिवृत्त पणन संचालक सुनिल पवार यांचा समितीत समावेश करण्यात आला आहे. हमीभावाने शेतमाल खरेदीसाठी राज्यात केवळ दोन नोडल एजन्सी होत्या. त्यानंतर, महाविकास आघाडी सरकारच्या काळात सहा एजन्सीना परवानगी देण्यात आली. आता त्यांची संख्या ४७ वर पोहचली. कोणत्याही राज्याच्या तुलनेत ही संख्या सर्वाधिक आहे. यातील काही संस्थाना निकषांची पूर्तता केलेली नसतानाही परवानगी देण्यात आली. यात काही व्यापारी आणि राजकारण्यांनाही केंद्रांचे वाटप करण्यात आले. अनेक संस्थांकडे तर खरेदीचा कोणताही पूर्वानुभव नव्हता. त्यामुळे नोडल एजन्सी नेमताना कोणते निकष असावेत, त्याची कार्यपद्धती काय असावी हे ठरविण्यासाठी सात सदस्यीय समितीची नेमणूक करण्यात आल्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी स्पष्ट केले.

----------

### कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क

कसा करता येईल, यावर अधिक भर देण्यासाठी प्रोत्साहन पर योजना जाहीर करावी. तसेच २० टक्के निर्यात शुल्क रद्द करावे. अन्यथा कृषिमंत्र्यांच्या दारासमोर आंदोलन करू, असा इशारा राजू शेट्टी यांनी दिला. राज्यात कांद्याचे दर कमी होत आहेत. ३ हजार रुपयांवरुन २ हजार रुपयांवर कांदा दर आले आहेत. यंदा २० टक्क्यांहून अधिक कांद्याचे उत्पादन वाढण्याची शक्यता आहे. त्यातच केंद्र सरकारने कांदा निर्यातीवर २० टक्के निर्यात शुल्क लावले आहे, त्यामुळे निर्यात शुल्क हटवावे, अशी मागणी शेट्टी यांनी केली आहे. यावेळी त्यांनी कृषिमंत्र्यांना टोलाही लगावला. शेट्टी म्हणाले, राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्यांची भिकाऱ्याबरोबर तुलना करण्यापेक्षा कांदा निर्यात कसा होईल, आणि निर्यात शुल्क कसं हटवता येईल, हे पाहावे, असे शेट्टी म्हणाले.

**कृषी मंत्र्यांना इशारा**

दरम्यान. केंद्र सरकारने कांदा निर्यात शुल्क लावून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान केले आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेकडून कांद्यावरील निर्यात शुल्क हटवण्याची मागणी केली जात आहे. परंतु केंद्र सरकार कांदा निर्यात बंदी उठवण्याची मागणी गांभीर्याने घेत नाही. त्यामुळे आता स्वाभिमानी शेतकरी संघटनेनं आक्रमक भूमिका घेत कृषिमंत्र्यांना इशारा दिला आहे.

--------------

### पैसे न दिल्याने कामे अडवली; केज

याबाबत जि.प. नरेगा गटविकास अधिकारी, उपमुख्यकार्यकारी अधिकारी यांना भेटून सदरील प्रकार सांगूनही त्याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याने सरपंच सचिन गायकवाड व ग्रामस्थांनी विभागीय आयुक्त यांना निवेदन देऊन न्याय न मिळाल्यावर उपोषण करण्याचा इशारा दिला होता. त्यानुसार दि. २४ फेब्रुवारीपासून विभागीय आयुक्त कार्यालयासमोर ग्रामस्थांनी उपोषण सुरु केले आहे. जोपर्यंत बीडीओ समृध्दी दिवाणे व इतर तीन कर्मचाऱ्यांवर कावाई होत नाही, तोपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नसल्याचा इशारा सरपंच सचिन गायकवाड यांनी दिला आहे. याबाबत बीडीओ समृध्दी दिवाणे यांच्याशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला मात्र त्यांनी फोन घेतला नाही.

-------------

cmyk

## ग्रामीण भागातील स्मशानभूमींचा कायापालट करणार : भाऊसाहेब घुगे

**जालना | प्रतिनिधी**

**ग्रामीण भागात जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून देण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना कटिबद्ध असून जिल्हा नियोजन मंडळासह विविध योजनांतून स्मशानभूमींचा कायापालट केला जाईल. अशी माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी दिली.**

उज्जैनपुरी ता. बदनापुर येथे मागासवर्गीय समाज स्मशानभूमीचे भूमिपूजन भाऊसाहेब घुगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सरपंच संतोष चोरमारे ,माजी सरपंच रामनाथ वाघ ,रामेश्वर शिंदे ,कल्याण चोरमारे, अमोल दळे ,रामू दराडे ,बाजीराव शिंदे, अण्णासाहेब शिंदे, सुखदेव चोरमारे, सुदाम शिंदे ,बाळू शिंदे ,मनोज शिंदे ,दादाराव शिंदे, बाबासाहेब महाराज शिंदे ,कृष्णा चोरमारे ,अंशीराम वाघ ,ज्ञानेश्वर वाढेकर ,रुस्तुम खरात ,दामु जाधव, रामू तोतरे ,बापू शिंदे ,गजानन शिंदे, दादाराव शिंदे, स्वप्निल वाघ यांच्यासह ग्रामस्थांची उपस्थिती होती. भाऊसाहेब घुगे यावेळी म्हणाले की, जिल्हा नियोजन समितीतून स्मशानभूमीसाठी पाच लक्ष रुपये मंजूर केले असून आ. अर्जुनराव खोतकर , आ. नारायण कुचे यांच्या सहकार्यातून शासनाकडे पाठपुरावा करून हिंदू समाजाच्या स्मशानभूमींचे सुशोभीकरण आणि धनगर समाज स्मशानभूमी शेड साठी येणाऱ्या महिनाभरातच जिल्हा नियोजन समितीतून निधी मंजूर केला जाईल. तथापि ग्रामस्थांनी जागा उपलब्ध करून दिल्यास दोन्ही समाजाच्या स्मशानभूमीचा प्रश्न मार्गी लागेल. असा विश्वास ही भाऊसाहेब घुगे यांनी व्यक्त केला.


# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार, दि. २६ फेब्रुवारी २०२५




# शासनाने सिडकोचा योग्य मोबदला न देल्यास सिडको प्रकल्प रद्द करणार - खा. कल्याण काळे

जालना | प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाने जालना जिल्ह्यात खरपुडी येथे सिडकोने नवीन प्रकल्प राबवण्याचा निर्णय घेतला असून, या संदर्भात मागील काही वर्षांत विविध प्रशासकीय आणि आर्थिक टप्प्यांवर निर्णय घेतले गेले आहेत. तथापि, या प्रकल्पाच्या व्यवहार्यतेबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. यासंदर्भात आज कॉंग्रेस जिल्हा कार्यालय येथे पत्रकार परिषद मध्ये खासदार डॉ. कल्याण काळे यांनी माहिती दिली.

सिडकोने जालन्यात प्रकल्प राबविण्यांचा निर्णय घेतल्यानंतर शेतकऱ्यांनी त्याचे स्वागत केले. त्यानुषंगाने भुसंपादनाची कारवाई देखील सुरू केली. परंतु सुरूवातील भूसंपादन करतांना शेतकऱ्यांना दिलेला भाव - मावेजा जमिनीची जी किंमत दिली. तिच रक्कम उर्वरित भुसंपादनाला देण्याची भुमिका शेतकऱ्यांची आहे. ठराविक लोकांना वेगळा भाव दिला जात असुन, उर्वरित शेतकऱ्यांना वेगळा भाव देण्यांत येत आहे, ही बाब अतिशय गंभीर आहे. शेतकऱ्यांना योग्य भाव न मिळाल्यास शेतकऱ्यांसमवेत आंदोलन उभारण्यांत येईल असे खासदार डॉ.कल्याण काळे यांनी स्पष्ट केले.

सदर प्रकल्पाची संकल्पना सन २०१८ मध्ये सिडकोने मांडली होती. त्यानंतर या आंतरराष्ट्रीय संस्थेची नियुक्ती करून प्रकल्पाच्या व्यवहार्यतेचा अभ्यास करण्यात आला. दिनांक १० जानेवारी २०२० रोजी प्रस्तुत केलेल्या अहवालात सदर प्रकल्प आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य नाही, असे स्पष्ट करण्यात आले होते. त्यानंतर शासनाने दिनांक ९ जुलै २०२० रोजी हा प्रकल्प निरधिसूचित करण्याचा निर्णय घेतला. मात्र, २०२२ आणि २०२३ मध्ये सिडको व शासनाकडून या प्रकल्पाच्या पुनरावलोकनास सुरुवात झाली आणि नवीन अहवालाच्या आधारे २०२४



मध्ये प्रकल्पास अंतिम मान्यता देण्यात आली.

पूर्वी अव्यवहार्य ठरलेला प्रकल्प काही वर्षांतच व्यवहार्य कसा काय ठरतो? नवीन आणि जुन्या अहवालांमध्ये काय तफावत आहे? हे शासनाने पारदर्शकपणे स्पष्ट करणे गरजेचे होते, परंतु त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आले आहे. तसेच, या प्रकल्पाच्या मंजुरीपूर्वीच काही व्यावसायिकांना संबंधित अधिकाऱ्यांमार्फत गोपनीय माहिती देण्यात आल्याची गंभीर बाब समोर आली आहे. या व्यावसायिकांनी शेतकऱ्यांकडून अत्यल्प दराने जमीन विकत घेऊन त्या जमिनींचे नंतर निवासी क्षेत्रात रूपांतर करण्यात आले. परिणामी, मूळ शेतकरी व भूधारक आर्थिक लाभापासून वंचित राहिले आहेत. याशिवाय, या प्रकल्पाच्या मंजुरी प्रक्रियेत अनेक संशयास्पद बाबी आढळून आल्या आहेत. आधीच अव्यवहार्य ठरलेल्या प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर सरकारी निधी खर्च करणे योग्य नाही. हा निधी इतर पायाभूत सुविधा उभारण्यासाठी वापरणे अधिक हिताचे ठरेल. स्थानिक शेतकऱ्यांनी अगोदरच्या भुसंपादनाला दिलेला भाव मिळाला नाही तर या प्रकल्पास तीव्र विरोध दर्शविला आहे. आमची जमीन डीनोटीफाईड करा असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. यामध्ये काही अधिकारी आणि व्यावसायिकांचे आर्थिक हितसंबंध असल्याने हा प्रकल्प राबविण्याचा प्रयत्न केला जात आहे. ही अत्यंत गंभीर बाब आहे.सदर प्रकल्पासाठी २४७ हेक्टर जमीन संपादित करायची असून, त्यामध्ये ५० गटांचा समावेश आहे. आतापर्यंत २० गटांतील ११९ हेक्टर जमिनीची संयुक्त मोजणी पूर्ण करून दर निश्चित करण्यात आले आहेत. उर्वरित ३० गटांपैकी १६ गटांची मोजणी अंतिम टप्प्यात असून, १४ गटांची मोजणी प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.या पार्श्वभूमीवर, सदर प्रकल्पाच्या मंजुरीसंदर्भात घेतलेल्या निर्णयाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करण्यांत यावी. तसेच, शासनाची दिशाभूल करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

खरपुडी येथे सिडकोचा वादग्रस्त प्रकल्प शेतकऱ्यांचे नुकसान, आर्थिक हितसंबंध, आणि पारदर्शकतेचा अभाव; शेतकऱ्यांना योग्य मोबदला न मिळाल्यास प्रकल्प रद्द करण्याची जोरदार मागणी''

-खासदार डॉ.कल्याण काळे




**परळी : राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते तथा कन्हेरवाडीचे सरपंच राजेभाऊ फड यांच्या वतीने कन्हेरवाडी गावातील दत्तात्रय तुकाराम खांडे यांच्या मुलीच्या विवाहासाठी १०००० रू मदत करण्यात आली. यावेळी प्रल्हाद मुंडे पाटील, से.स.सो. व्हाइस. चेअरमन मिनीनाथ दादा फड, माजी उपसरपंच रामहारी फड, विजय मुंडे, बाबुराव फड, महादेव मामा मुंडे, रमेश फड, समाधान मुंडे आदि ग्रामस्थ उपस्थित होते.**

# हरित व स्वच्छ ऊर्जेचे अंगीकार करून पर्यावरणास स्वच्छ बनवा

**जालना | प्रतिनिधी**

संरक्षण क्षमता (महोत्सव) हा आपल्या देशाच्या ऊर्जा सुरक्षा, शाश्वत विकास आणि पर्यावरण संरक्षणासाठी भारत सरकारने सुरू केलेला एक महत्त्वाचा राष्ट्रीय कार्यक्रम आहे. अशी माहिती आज एका पत्रकार परिषद मध्ये जालना येथे देण्यात आली. या कार्यक्रमाचे अंतिम उद्दिष्ट म्हणजे जीवाश्म इंधनावरील वाया जाणारा खर्च रोखणे, परकीय तिजोरीवरील वाढता भार कमी करणे आणि जीवाश्म इंधन जाळण्यामुळे निर्माण होणाऱ्या हरितगृह वायूंच्या प्रतिकूल परिणामांपासून पर्यावरणाचे संरक्षण करणे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय आणि तेल उद्योगाचे राज्यस्तरीय समन्वयक संबंधित राज्य सरकारच्या सक्रिय सहभागाने



समर्थनाने जनजागृती पसरविण्यासाठी विविध उपक्रम हाती घेतात. पेट्रोलियम उत्पादनांच्या संवर्धनासाठी, इंधन कार्यक्षम उपकरणांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि पेट्रोलियम संवर्धनासाठी धोरणे आणि धोरणे प्रस्तावित करण्यात सरकारला मदत करण्यासाठी तेल विपणन कंपन्या (ओएमसी) आघाडीवर आहेत.त्याच कळकळीने सक्षम (संरक्षण क्षमता महोत्सव) २०२४-ते २८ फेब्रुवारी, २०२५ दरम्यान आयोजित केले जातील, संपूर्ण देशभर ज्याची टॅगलाइन ''ग्रीन अँड क्लीन एनर्जीद्वारे क्लीन एन्व्हायर्नमेंट'' असेल (हरित आणि स्वच्छ ऊर्जेचे अंगिकार करा आणि पर्यावरणास स्वच्छ बनवा)

२८ फेब्रुवारी, २०२५ पर्यंत तेल विपणन कंपन्या (ओएमसी) राज्यभरात संवर्धनाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि शाश्वत विकास आणि पर्यावरण संरक्षणासाठी वर्तनात्मक बदलांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध उपक्रम राबवतील.याचाच एक भाग म्हणून, महाराष्ट्रातील तेल उद्योग फेब्रुवारी २०२५ रोजी वाय.बी. चव्हाण सेंटर, रंगस्वर हॉल, मंत्रालयासमोर, मुंबई येथे उद्घाटन समारंभाचे आयोजन करत आहे.या पंधरवड्यात शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी गट चर्चा/वादविवाद, महाविद्यालयांमध्ये ग्राफिटी/भिंतीचित्र स्पर्धा, इंधन कार्यक्षम ड्रायव्हिंग स्पर्धा, लेख लेखन, पत्रकार परिषदा आणि टीव्ही/रेडिओवरील टॉक शो असे विविध उपक्रम राबवले जातील सक्षम मोहिमेदरम्यान ओएमसी, शालेय मुले, तरुण, एलपीजी वापरकर्ते, ड्रायव्हर्स/फ्लीट ऑपरेटर, उद्योग कर्मचारी/कामगार, शेतकरी, निवासी संस्था, ग्रामपंचायती, स्वयंसेवी संस्था इत्यादी विविध मोठ्या वर्गापर्यंत पोहोचतील आणि इंधन संवर्धनाचे महत्त्व, फायदे आणि पद्धतींबद्दल जागरूकता पसरवण्यासाठी आणि इंधन-कार्यक्षम तंत्रज्ञान आणि पद्धतींचा अवलंब करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी विविध इंधन संवर्धन उपक्रम राबवतील.

# विद्यार्थ्यांचे उद्देश केंद्रित असावे -डॉ.धम्मपाल घुंबरे

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

खोलेश्वर महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागाच्या वाणिज्य अभ्यास मंडळाचे उद्घाटन दि.२४ फेब्रू.२०२५ रोजी डॉ. धम्मपाल घुंबरे यांच्या हस्ते कै. गोपीनाथराव मुंडे सभागृहात पार पडले यावेळी ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत होते, पुढे बोलताना ते म्हणाले विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन जीवनामध्ये शिक्षण घेत असताना विविध गोष्टींचा सखोल अभ्यास व खडतर परिश्रम करण्याची तयारी ठेवली तर नक्कीच यश मिळेल.ध्येयनिश्चिती करून खडतर प्रयत्न केले व त्यानुसार मार्गक्रमण केले तर यश निश्चितच मिळते यासोबतच उद्देश निश्चिती करत असताना आयुष्यात नक्की आपल्याला काय




साध्य करायचे याचे देखील भान विद्यार्थ्यांना असणे गरजेचे आहे याबाबतचे सखोल मार्गदर्शन विविध उदाहरणाच्या माध्यमातून त्यांनी विद्यार्थ्यांसमोर मांडले या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. दीपक फुलारी यांनी भुषविले विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना त्यांनी वेगवेगळया कौशल्यावर आधारीत अभ्यासक्रमांचा आपल्या दैनंदिन जीवनामध्ये उपयोग करून यशस्वी कसे होता येईल याकडे लक्ष वेधले ,यासोबतच या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या उद्योगात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर व आत्मनिर्भर भारत या विषयावरील भित्तीपत्रकांचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी भित्तीपत्रक विद्यार्थासमोर सादर केले त्यानंतर वाणिज्य अभ्यास मंडळ वर्ष २०२४ -२५ च्या नवनिर्वाचित सदस्यांचे स्वागत मान्यवरांच्या हस्ते गुलाब पुष्प देऊन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. सुभाष पटेकर यांनी केले, कार्यक्रमाचे संचलन कु.आकांक्षा पौळ व कु.अंकिता देशमाने यांनी केले तर आभार कु. काजल चव्हाण यांनी मानले, या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वाणिज्य विभागाच्या सर्व प्राध्यापक बंधू भगिनींनी प्रयत्न केले, या कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी सहभागी झाले होते.

# शेतकऱ्यांना ई-पीक पाहणी आणि ॲग्रीस्टॅक नोंदणी अनिवार्य

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

**तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी ई-पीक पाहणी आणि ॲग्रीस्टॅक अंतर्गत शेतकरी ओळख क्रमांक नोंदणी अत्यावश्यक झाली आहे. प्रशासनाने यासाठी अंतिम तारीख २८ फेब्रुवारी २०२५ निश्चित केली आहे. शासकीय योजनांचा लाभ मिळवण्यासाठी शेतकऱ्यांनी वेळेत नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन अंबाजोगाईचे तहसीलदार विलास तरंगे यांनी केले आहे.**

ई-पीक पाहणीचे प्रलंबित कामकाज ग्राम महसूल अधिकारी आणि त्यांचे सहाय्यक यांच्या माध्यमातून सुरू आहे. पीक पाहणीसाठी शेवटची तारीख २८ फेब्रुवारी असून, ज्यांची पाहणी अद्याप झालेली नाही, त्यांनी तातडीने ती पूर्ण करून घ्यावी. तसेच, ॲग्रीस्टॅक अंतर्गत शेतकरी ओळख क्रमांक ( ) नोंदणी जवळच्या आपले सरकार सेवा केंद्रात सुरू आहे. पुढील काळात पी.एम. किसान योजना, पीक विमा, नैसर्गिक आपत्ती अनुदान, पीक कर्ज तसेच अन्य शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी ही नोंदणी बंधनकारक असेल.नोंदणीसाठी शेतकऱ्यांना आधार कार्ड, मोबाईल क्रमांक आणि शेतीचा गट क्रमांक आवश्यक आहे. नोंदणी न केल्यास शासकीय योजनांचा लाभ मिळणार नाही. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांनी आपले सरकार सेवा केंद्र, महा ई-सेवा केंद्रात संपर्क साधून लवकरात लवकर नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन तहसीलदारांनी केले आहे.

पान ६ वरून...

## पत्रकारांची कृषी सफर

मार्गदर्शनानुसार फळबागांचा प्रयोग केला आहे विविध जातीची आंबे,संत्री,मोसंबी, चिंच,डाळिंब यासह अनेक फळबागा येथे फुलविण्याचे दिसून येत आहे.आज तालुक्यातील काकड्याची किन्ही येथील शेतीनिष्ठ शेतकरी दत्ताभाऊ काकडे यांच्या फळबागेला आष्टी तालुका पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी आज आवर्जून भेट देत पाणी व्यवस्था सिंचन सुविधा जमिनीचा पोत फळबागेत चालवलेले विविध प्रयोग आणि अधिकाऱ्यांनी केलेले मार्गदर्शन यातून फुललेली ही फळबाग त्यांनी बारीक नजरेतून पाहिली. दरम्यान शेतकऱ्यांनी हाती घेतलेल्या फळबागांना शासनाने खऱ्या अर्थाने आर्थिक पाठबळ आणि अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन दिल्यास भविष्यात ऊसतोड कामगार असलेला जिल्हा हे ओळख पुसून शेती क्षेत्रातील अध्याय निर्माण होईल असा विश्वास ज्येष्ठ पत्रकार तथा उपसंपादक उत्तम बोडखे यांनी व्यक्त केला.

## वाळूचा टिप्पर दंड भरण्यासाठी

यांच्या उपस्थीत्त अंबड तहसिल कार्यालयाचे गौण खनिज पथक हे गस्तीवर असताना आम्हास पाचोड टोल नाका येथे दोन ब्रास चा वाळु वाहतुक करणारा हायवा दिसुन आला सदर वाहनावर कुठलाही वाहन क्रमां नव्हता तेव्हा वाहन चालकास वाहन थांबवून वाळू वाहतुक परवाना बाबत विचारणा केली असता काही सांगितलं नाही. सदर वाहनाची तपासणी केली असता त्याचा चेसिस क्रमांक ३०८६२ असा दिसून आला तेव्हा सदर वाहन पथकाने आपल्या ताब्यात घेवुन तहसिल कार्यालय अंबड येथे लावण्यात आले आहे असे पंचनाम्यात नमूद करण्यात आले आहे.

## अखिल भारतीय सर्ववर्गीय जायस्वाल महासभेच्या बैठकीत विविध पदाधिकाऱ्यांच्या निवडीसह संघटनात्मक विचारविनिमय

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

अखिल भारतीय जायस्वाल सर्ववर्गीय महासभेची नुकतीच नवी दिल्ली येथे महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष राजकिशोर मोदी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीत देशभरातुन अनेक वरिष्ठ पदाधिकारी सहभागी झाले होते. ज्यामध्ये माजी राष्ट्रीय अध्यक्ष अशोक जायस्वाल इंदोर , राष्ट्रीय सचिव ॲड शैलेंद्र जायस्वाल, राष्ट्रीय कोषाध्यक्ष त्रिलोकिनाथ जायस्वाल मुंबई , अजयकुमार जायस्वाल दिल्ली , विजय कुमार भगत माजी उपमहापौर दिल्ली , अरविंद जायस्वाल उत्तर प्रदेश, अनुप जायस्वाल झान्सी, अजयकुमार जायस्वाल, सुषमा जायस्वाल, सचिन राकेश रंजन, शिवजी जायस्वाल, ब्रिजेश गुप्ता, ओम जायस्वाल, अनुप शिवहरे, जयप्रकाश जायस्वाल यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीच्या प्रारंभी सहस्त्रबाहू अर्जुन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.



बैठकीतनंतर महासभेच्या राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात येऊन त्यांना महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष राजकिशोर मोदी यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले. नियुक्ती पत्र देतांना सर्व नवीन पदाधिकारी यांनी दिलेल्या सर्व समाजिक जवाबदारीची पूर्तता करावी असे आवाहन राष्ट्रीय अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी केले. बैठकीमध्ये महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी समाजाच्या विविध प्रश्नावर सखोल अशी चर्चा केली. त्याचबरोबर आगामी काळात महासभेच्या कार्याचा आढावा घेण्यात आला. येणाऱ्या काळात नवी दिल्ली येथे राष्ट्रीय राजनैतिक चेतना रॅलीचे आयोजन करण्यात येणार असल्याचे ठरविण्यात आले. ही रॅली यशस्वी करण्यासाठी विविध समित्या स्थापन करण्यात येणार आहेत ज्यामध्ये राष्ट्रीय स्तर , प्रादेशिक स्तर, क्षेत्रीय स्तर तसेच जिल्हास्तरीय समितीचे गठन करण्यात असल्याचे अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी या बैठकीप्रसंगी नमूद केले. त्याचबरोबर संयोजक तथा समन्वय टीमच्या माध्यमातून संपन्न होणारी राष्ट्रीय चेतना रॅली यशस्वी होण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

# बाजार समित्यांच्या विविध मागण्यांचे पणनमंत्र्यांना सभापती नरवडे, उपसभापती मोरे यांनी दिले निवेदन

**माजलगाव | प्रतिनिधी**

बाजार समितीच्या असलेल्या विवीध अडचणी व मागण्यांचे निवेदन पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा कृषि पणन मंडळाचे अध्यक्ष जयकुमार रावल यांना माजलगाव बाजार समितीचे सभापती जयदत्त अण्णा नरवडे, उपसभापती श्रीहरी नाना मोरे यांनी पुणे येथे दि. २४ फेब्रुवारीला कृषि उत्पन्न बाजार समित्यांची राज्यस्तरीय पणन परिषदेत दिले.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बाजार समित्यांच्या उत्पन्नातुन ०.५ टक्के अंशदान राज्य कृषि पणन मंडळास भरणा करावा लागतो परंतु अंशदान भरणा करूनही बाजार समित्यांना फायदा मिळत नाही. याचा विचार करून अंशदान आकारणी उत्पन्नावर न करता होणा-य वाढव्यावर करावी जेणेकरून समित्या सक्षम होण्यास मदत होईल. माजलगाव बाजार समितीने सा. सन २०१६ - १७ व सा. सन २०१७ - १८ या वर्षात शासकीय नाफेड/राज्य, सहकारी मार्केट फेडरेशन मार्फत तुर, चना खरेदी केली होती. यासाठी माजलगाव बाजार समितीने खरेदी केंद्रावर आवश्यक त्या सोयी, सुविधा, कर्मचारी वर्ग सुविधा पुरविल्या होत्या. याठिकाणी शेतमाल खरेदीवरील बाजार फी व इतर अनुषांगीक खर्चाची रक्कम ५१ लाख ९१ हजार ५९७ थकीत असुन सबंधित कार्यालयास बाजार समितीने पत्रव्यवहार करूनही फीस मिळालेली नाही. या फीस वसुलीसाठी पणन मंडळाकडुन कसल्याही प्रकारची कारवाई करण्यात आलेली नाही व सहकार्यही मिळालेले नाही. त्यामुळे सदरील फीस बाजार समितीस मिळावी यासाठी संबंधीत कार्यालयास निर्देश देवुन सदरील फीस मिळवुन द्यावी, बाजार समितीचे कार्यक्षेत्रात सा. स. २०२० - २१ मध्ये राज्य



कापूस उत्पादक पणन महासंघामार्फत हमीदराने १ लाख ६२ हजार ६४.९५ क्विंटल कापुस खरेदी केलेला असुन प्रति शेकडा १/- प्रमाणे मार्केट फी रू. १ कोटी ४ लाख ७१ हजार ५५६ होते. सदरील फीसमधुन राज्य पणन मंडळ पुणे यांनी दि. महाराष्ट्? राज्य सहकारी कापुस उत्पादक पणन महासंघ विभागीय कार्यालय परळी वै. जि. बीड यांचेकुन २५ लक्ष अंशदान पोटी परस्पर वर्ग करून घेतले तर बाजार समितीस २४ लाख २६ हजार २६२ असे एकुण ४९ लाख २६ २६२ हंगाम २०२० - २०२१ मधील मार्केट फीस सी.सी.आय. दराप्रमाणे ०.५५ पैसे अदा केले परंतु उर्वरीत ०.५० पैसे प्रमाणे येणे रक्कम ५५ लाख ४५ हजार २९४ या बाजार समितीस दिलेले नाहीत. सदरील हंगामात जिल्ह्यातील इतर बाजार समितीच्या सीसीआयने खरेदी केलेल्या कापसावर मार्केट फीस प्रति शेकडा १/- प्रमाणे बाजार समितीस अदा केलेली आहे. त्याचप्रमाणे माजलगाव बाजार समितीसही रू. १/- प्रमाणे फीस मिळणे गरजेचे असुन संबंधित कार्यालयासोबत याबाबत बाजार समितीने पत्रव्यवहार केलेला आहे परंतु अद्यापपर्यंत उर्वरीत रक्कम येणे थकीत आहे. सदरील रक्कम देण्यासाठी संबंधीत कार्यालयास निर्देश द्यावेत, त्याचबरोबर कृषि उत्पन्न बाजार समितीचे कार्यक्षेत्रात हमी दराने चना, तुर, सोयाबीन, मुग आदी शेतीमालाची खरेदी खाजगी निवीष्ठा यांना देण्यात आलेली आहे. या खाजगी निवीष्ठा या बाजार समितीशी कसलाही संबंध न ठेवता खरेदी करतात, यामध्ये मोठ्या प्रमाणात शेतक-यांची लुट होण्याची शक्यता नाकारता येत नाही व अशा खरेदीमुळे बाजार समित्या मार्केट फी पासुन वंचित राहत आहे. राज्य कृषि पणन मंडळाने विकसन कामासाठी व टीएमसी प्रकल्पासाठी माजलगाव बाजार समितीस दिलेल्या कर्जाच्या व्याजामध्ये शंभर टक्के व्याज सवलत देण्याची मागणी देखील करण्यात आली. निवेदनावर बाजार समितीचे सभापती जयदत्त अण्णा नरवडे यांची स्वाक्षरी आहे. यावेळी उपसभापती श्रीहरी नाना मोरे, सचिव एच. एन. सवणे, संचालक अमोल जाधव, भगवान आगे, नंदकिशोर सजगणे, प्रभाकर होके, वडवणीचे सभापती संभाजी शिंदे यांचेसह संचालक मंडळाची उपस्थिती होती.

cmyk

# खते लिंकिंगमुळे शेतकरी हैराण; कृषिमंत्र्यांची कबुली !

पुणे : खतांच्या लिंकिंगमुळे शेतकरी हैराण झाला आहे. शेतकरी विविध कारणांनी अस्वस्थ, अस्थिर असून अशा परिस्थितीत कृषी-पणन आणि पशुसंवर्धन विभागाने एकदिलाने काम करत, शेतकऱ्यांना अस्थिरतेतून बाहेर काढले पाहिजे, असे मत कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी व्यक्त केले.

राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने बाजार समित्यांच्या राज्यस्तरीय पणन परिषदेमध्ये कृषिमंत्री कोकाटे बोलत होते. या वेळी पणनमंत्री जयकुमार रावल यांच्यासह पणन आणि बाजार समित्यांचे अधिकारी पदाधिकारी उपस्थित होते. या वेळी मंत्री कोकाटे म्हणाले, ''कृषी विभागाचा आणि शेतकऱ्यांचा आत्मा पणन विभाग आणि बाजार समित्या आहेत. शेतकरी मोठ्या हिंमतीने कष्टाने शेतीमाल पिकवितो. मात्र बाजार समित्यांमध्ये शेतीमालाला योग्य दर मिळत नसल्याने तो हताश, अस्वस्थ आणि अस्थिर होतो. त्याचच खतांच्या लिंकिंगमुळे शेतकरी हैराण आहे. शेतीमालाचे दर



पडले की शेतकऱ्यांचा रोष सरकारवर येतो. कांदा, टोमॅटो सारख्या पिकांना कधीतरी चांगले दर मिळतात. मात्र आवक वाढली आणि दर पडले की कांदा आणि टोमॅटो फेकून द्यायची वेळ येते.''

### कृषी पदवीधर शेतीत नाही हे दुर्दैव

राज्यात अनेक कृषी महाविद्यालये, विद्यापीठे, कृषी अभियांत्रिकीही महाविद्यालये आहेत. यामधील केवळ २ टक्के पदवीधर थेट शेतीत येतात. मात्र ९८ टक्के पदवीधर अधिकारी होतात. हे दुर्दैव असून कृषी पदवीधारकांनी आधुनिक शेती करण्याची गरज आहे, अशी अपेक्षा कृषिमंत्री कोकाटे यांनी व्यक्त केली.

बांधावरील खरेदीमधील फसवणुकीबाबत मंत्री कोकाटे म्हणाले, ''बांधावरच्या खरेदीमध्ये व्यापारी शेतकऱ्यांना दमदाट्या करून लुटणार करतात. व्यापारी फक्त स्वतःचा धंदा कसा वाढेल याचा विचार करत असतो. बांधावरील खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांची बाजार समित्यांकडे नोंद हवी, त्यांची बँक गॅरंटी हवी. तसेच अनेक आणि कडक कायदे हवेत. फसविणाऱ्या व्यापाऱ्यांना अटक होते. दोन दिवसांत जामिनावर तो व्यापारी बाहेर येतो आणि पुन्हा लूटमारीला येतो. हे टाळण्यासाठी कठोर कायद्यांची गरज आहे.''

# पांढरे वांगे देतात भरघोस उत्पन्न

राज्यातील सर्वच भागांमध्ये वांग्याची शेती मोठ्या प्रमाणात केली जाते. विशेष म्हणजे बाजारात वांग्याला नेहमीच मागणी असते. ज्यामुळे त्याला भावही चांगला मिळतो. परिणामी, शेतकऱ्यांना भाव सापडल्यास, वांग्याच्या शेतीतून मोठे आर्थिक उत्पन्न मिळते. साधारणपणे शेतकरी हिरव्या किंवा निळ्या रंगाच्या वांग्याची शेती करतात. मात्र, गेल्या काही वर्षांमध्ये अंड्यासारख्या दिसणाऱ्या पांढऱ्या वांग्याची मागणी बाजारात मोठ्या प्रमाणात वाढली आहे. इतकेच नाही तर विदेशात देखील पांढऱ्या वांग्यांना मोठी मागणी असते.

अशी होते लागवड : सर्वसाधारणपणे वांग्याची शेती खरीप, रब्बी आणि उन्हाळी अशा तिन्ही हंगामांमध्ये केली जाते. मात्र, पांढऱ्या वांग्याची शेती प्रामुख्याने मार्च किंवा एप्रिल महिन्यात आणि डिसेंबर महिन्यात केली जाऊ शकते. बाजारात हे पांढरे वांगे कमी दिसतात त्यामुळे त्यांना दरही अधिकचा मिळतो. या सफेद वांग्याच्या लागवडीसाठी सर्वप्रथम योग्य बियाण्याची निवड करून, नर्सरीमध्ये रोपे तयार करत सामान्यपणे लागवड करणे आवश्यक ठरते. हे सफेद वांगे शरीरासाठी खूप पौष्टिक असते. विशेष म्हणजे वांग्याला अधिक काळापर्यंत फळ मिळते. ज्यामुळे शेतकऱ्यांना अधिक काळ कमाई मिळण्यास मदत होते.

एवढा येतो खर्च : सर्वसाधारणपणे सफेद वांग्याच्या लागवडीसाठी शेतकऱ्यांना हेक्टरी दोन लाखांपर्यंतचा खर्च येऊ शकतो. यात ठिबक, मल्चिंग असा सर्व प्राथमिक खर्च धरला जाऊ शकतो. ठिबक व्यवस्था असेल तर सफेद वांग्याच्या शेतीला अधिक पाण्याचीही आवश्यकता नसते. त्यानंतर शेतकरी आपल्याकडील सेंद्रिय खते किंवा कंपोस्ट खते वापरून या पिकाचा उत्पादन खर्च देखील कमी करू शकतात. याशिवाय शेतकरी सफेद वांग्याला सेंद्रिय निंबोळी अर्क तयार करून कीड नियंत्रण करू शकतात. सफेद वांग्याचे पीक हे ;लागवडीनंतर ७० ते ९० दिवसांत तोडणीला येते.

असे मिळेल उत्पादन/उत्पन्न : शेतकऱ्यांनी सफेद वांग्याच्या लागवडीसाठी योग्य वाणाची निवड, योग्य पीक व्यवस्थापन तसेच वेळोवेळी



आवश्यक तितकेच पाणी दिले. तर शेतकऱ्यांना हेक्टरी १०० टन वांग्याचे उत्पादन सहज मिळू शकते. बाजारात वांग्याला कमीत कमी १० ते १५ रुपये प्रति किलोचा दर सहज मिळतो. ज्यामुळे शेतकऱ्यांना एक हेक्टर शेतीतून १० ते १५ लाखांची कमाई सहज मिळू शकते. अर्थात एखाद्या शेतकऱ्याने पांढऱ्या वांग्याची लागवड बिघाभर शेतीत केल्यास, अशा शेतकऱ्यांना बिघ्यात २ लाख उत्पन्न सहज मिळू शकते. सामान्य वांग्याची शेतीची आणि पांढऱ्या वांग्याची शेती जवळपास सारखीच असते.

अधिक पौष्टिक गुणधर्म : भारतात प्रामुख्याने पांढऱ्या वांग्याची सर्वाधिक लागवड जम्मू-काश्मीर राज्यामध्ये होते. इतर राज्यामध्ये कमी-अधिक प्रमाणात पांढऱ्या वांग्याचे उत्पादन होते. मात्र इतर राज्यामध्ये सफेद वांग्याची लागवड ही फारच नगण्य स्वरूपात होते. हिरव्या, निळ्या रंगाच्या वांग्यापेक्षा या सफेद वांग्यामध्ये अधिक पौष्टिक गुणधर्म आढळतात, त्यामुळेच बाजारात त्याला मागणीही जास्त असते.

# दिवसाला १६ ते १८ लिटर दूध देते या जातीची म्हैस

अनेक शेतकरी शेतीबरोबर जोडधंदा म्हणून दुग्ध व्यवसाय करतात. तर यासाठी गाय-म्हशींचे पालन करतात. तसेच कोणत्या म्हशीच्या जातीचे पालन करून अधिक उत्पन्न मिळवता येईल या शोधात असतात. महाराष्ट्रामध्ये प्रामुख्याने म्हशींच्या मराठवाडी, पंढरपुरी आणि नागपूरी या तीन जातीचे पालन केले जाते. यातील पंढरपुरी या जातीचे पालन तर काटक तसेच दुधासाठी केले जाते.

पंढरपुरी म्हैस ही एक भारतीय म्हशीची जात आहे. पंढरपुरी ही सोलापूर, कोल्हापूर, सातारा, सांगली, बेळगाव या ठिकाणी प्रामुख्याने आढळते. या जातीच्या म्हशी मध्यम आकाराच्या असून, यांचा चेहरा लांब आणि निमुळता असतो. सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर तालुका हे तीचे मूळ गाव आहे. या तालुक्यावरूनच तिला पंढरपुरी हे नाव पडले आहे. पंढरपुरी म्हैस महाराष्ट्रातील सोलापूरबरोबरच कर्नाटक राज्यातील धारवाड जिल्ह्यातही आढळून येत असल्याने तिला धारवाडी असेही म्हटले जाते.

पंढरीपुरी जातीची वैशिष्ट्ये : पंढरपुरी म्हैस कडक उन्हात, कमी पावसाच्या प्रदेशात, निकृष्ट चाऱ्यावर तग धरून राहणारी काटक अशी जात आहे. लांब व निमुळता चेहरा, खांद्यापर्यंत पोचणारी लांब व पिळवटलेली शिंगे ही या जातीची वैशिष्ट्ये आहेत. विशेष म्हणजे या म्हशींची शिंगे ४५ ते ५० सेंटीमीटर पर्यंत वाढलेली आणि अगदी खांद्यापर्यंत आलेली असतात.



तलवारीच्या आकाराची व लंबुळकी-पिळदार शिंगे आणि त्यांच्या शरीराच्या ठेवणीमुळे या म्हशी देशभरात प्रसिद्ध आहे. या म्हशीचे वजन ४५० ते ५०० किलो इतके असते. दुधाचे उत्पादन ६ ते ७ लिटर इतके असते. उत्तम व्यवस्थापनात दुधाचे उत्पादन १५ ते १८ लिटर पर्यंत जाऊ शकते.

अधिकचे दूध उत्पादन : मध्यम शरीर, लवकर वयात येणाऱ्या पारड्या, कमी भाकड काळ, पहिल्या वेताच्या वेळी कमी वय, उत्तम प्रजनन, दुग्धोत्पादनक्षमता आणि सातत्य यासर्व गुणांमुळे ही जात दुधासाठी चांगली आहे आणि तिला मागणीही जास्त आहे. चांगले व्यावस्थापन केल्यास एका वेतातील दूध उत्पादन १५०० ते १८०० लिटरपर्यंत मिळते. या जातीचे रेडे ओढकामासाठी व शेतीच्या कामासाठी वापरले जातात.

सर्व प्रकारच्या वातावरणाला सूट : अधिक उत्पादन क्षमतेमुळे म्हैस बाकीच्या जनावरांपेक्षा फायद्याची ठरते. तिच्या दुधामध्ये स्निग्धाचे प्रमाण जास्त असून तूस, कुठार यांसारख्या शेतातल्या उरलेल्या अवशेषांवर प्रक्रिया करून चांगल्या प्रकारचे खाद्य बनवून म्हशींना देता येते. दुग्ध व्यवसायासाठी उपयुक्त असणारी ही पंढरपुरी म्हैस हलक्या आणि निकृष्ट चाऱ्यावर सुद्धा तग धरून राहू शकते. जवळजवळ सर्व प्रकारच्या वातावरणात ही जात चांगले दूध देते.

विशेष लक्ष देण्याची गरज नाही : या म्हशीच्या पारड्या वयाच्या २५ ते ३० महिन्यांत गाभण राहतात. ३५ ते ४० महिन्यांत पहिल्यांदा वितात. दर १२ ते १३ महिन्यात या जातीच्या म्हशी एका पारड्याला जन्म देतात. त्यानंतर साधारण तीन ते पाच दिवसांपर्यंत दूध देण्याची क्षमता या म्हशीमध्ये आहे. बाकी सर्व देखरेख आणि सांभाळ हा इतर जनावरांसारखाच असल्याने विशेष असे लक्ष या म्हशींना द्यावे लागत नाही. लवकर गाभण राहणे, कमी भाकड काळ आणि चांगली प्रजनन क्षमता असणाऱ्या या पंढरपुरी म्हशीचे उत्तम व्यवस्थापन केल्यास नक्कीच दुग्ध व्यवसायात फायदा होईल.

# संकरित नेपिअर गवत उत्पादनाचे तंत्रज्ञान

जनावरांच्या समतोल आहारामध्ये वैरण, हिरवा चारा, आंबवण, खनिज पदार्थ, जीवनसत्वे, पाणी याच्या समावेश होतो. त्यात सुमारे ७० टक्के भाग हा हिरवा चारा असतो. त्यामुळे लुसलुशीत व पौष्टिक चाऱ्याचे नियोजन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यासाठी संकरित नेपिअर हे बहुवार्षिक गवत महत्वाचे ठरते.

पशु आहारात सकस हिरव्या चाऱ्याचे महत्व : आहारात जास्त प्रमाणात खुराक व कमी प्रमाणात हिरवा चारा असे प्रमाण जास्त काळ राहिल्यास जनावरांच्या पचन संस्थेवर विपरीत परिणाम होतो. जनावरांची निरोगी वाढ व प्रजनन समता टिकविण्यासाठी हिरवा चारा आवश्यक. दर्जेदार हिरवा चारा अभावी गाभण गायींना कमजोर व रोगट वासरे निपजतात. जनावरांच्या आहारात हिरव्या चाऱ्याची कमतरता असल्यास उत्तम खुराक देवुन सुध्दा जनावरांचे उत्पादनक्षम वय व उत्पादन यावर परिणाम होऊ शकतो.

नेपिअर लागवडीसाठी जमीनीची निवड : संकरित हे सर्व प्रकारच्या जमिनीत वाढते. जमीनही, खोल, मध्यम ते भारी, काळी कसदार, उत्तम निचऱ्याची जमीन निवड करावी. जमीन तयार करताना जमीनीची खोल नांगरट करावी व कुळवाच्या दोन आडव्या उभ्या पाळ्या घालुन जमीन तयार करावी. यामुळे गवताची जोमदार वाढ होते व चांगले फुटवे मिळतात.

लागवडीचा हंगाम व पेरणीची योग्य वेळ : या



गवताची साधारपणे लागवड ही खरीप व उन्हाळी हंगामात करता येते. या गवताची खरीप हंगामात लागवड जून ते ऑगस्ट व उन्हाळी हंगामात फेब्रुवारी ते मार्च या कालावधीत करावी.

संकरीत नेपिअर सुधारित वाण व वैशिष्टये : या पिकाचे तीन वाण महत्वाचे आहेत फुले जयवंत, फुले यशवंत, फुले गुणवंत हे वाण महात्मा फुले कृषी विद्यापीठाने विकसित आहेत.

लागवड पद्धत : या गवताची लागवडीसाठी ठोंबे लावावित. लागवडीसाठी साधारणपणे ३ महिने वाढु दिलेल्या गवताच्या खोडाचा वापर करताना खोडाचा जमिनीकडील दोन तृंतीयांश (२/३) भागातील २ ते ३ डोळे असणारे कांड्या काढुन लागवड करावी. या गवताची लागवड ९० ६० से. मी. (३२) फुट अंतरावर करावी. गवताचे ठोंब ९० से. मी. अंतरावर (३ फुट) काढलेल्या सरीच्या बगलेत मुळासहित गवताची ठोंब डोळे असणाऱ्या कांड्याद्वारे लागवड करावी. दोन डोळे जमिनीत व एक जमिनीवर राहिल अशा पद्धतीने लागवड करावी. दोन झाडांमध्ये २ फुट (६० से. मी.) अंतर ठेवावे. एका ठिकाणी एक जोमदार ठोंब लावल्यास हेक्टरी १८५०० ठोंब पुरसे होतात.

गवत वाढीच्या काळात आंतर मशागत : सुरवातीच्या वाढीच्या काळात १ किंवा २ खुरपण्या देणे आवश्यक आहे. त्यानंतरची खुरपणी गरजेनुसार करावी. दरवर्षी खांदणी करुन मातीची भर झाडास द्यावी. प्रत्येक वर्षी एक ठिकाणी २ ते ३ फटवे ठेवुन इतर जादा फुटवे लागवडी करीता नवीन ठिकाणी वापरावेत. मर झालेले फुटवे पुंजक्यातुन काढुन टाकावेत. जोमदार २ ते ३ फुटवे वाढीसाठी पोषक वातावरण निर्माण करावे.

खत व्यवस्थापन : लागवडीपुर्वी १० टन शेणखत प्रति हे आणि १५० ग्रॅम ॲझेटो बॅक्टर, पी. एस. बी (द्रवरुप) जीवाणु खत प्रति १००० ठोंबासाठी प्रक्रिया करुन रासायणिक खताची मात्रा, ५०:५०:४० नत्र, स्फुरद, व पालाश प्रति हेक्टरी प्रमाणे, यापैकी प्रत्येक कापणीनंतर २५ किलो नत्र प्रति हे द्यावे.

गवताची कापणी व्यवस्थापन व उत्पादन : या गवाताची हिरव्या चाऱ्यासाठी पहिली कापणी ६० ते ६५ दिवसांनी करावी. कापणी जमिनी पासुन साधारण १५ ते २० से. मी. उंचीवर केल्यास फुटवे चांगले फुटण्यास मदत होते. नंतरच्या कापण्या पीक वाढीनुसार ४५ ते ५० दिवांनी कराव्यात. अशाप्रकारे वर्षभरात ६ ते ७ कापण्या घेता येतात. व चारा शक्यतो कडबा कुट्टी मध्ये बारीक करुन द्यावा म्हणजे तो वाया जाणार नाही.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

३२०: आजच्या दिवशी चंद्रगुप्त मौर्य ला २१ व्या वर्षी पाटलीपुत्राचा सम्राट बनविल्या गेले.
१९७५: गुजरात येथे देशातील पहिले पतंग संग्रालय ''शंकर केंद्र'' गुजरात च्या अहमदाबाद येथे स्थापन केले.
१९०९: सिनेमाकलर या पहिल्या रंगीत चित्रपट प्रथम पॅलेस थिएटर, लंडन मध्ये प्रदर्शित झाला.
१९२८: बाटून ख्रिश्चन बनलेल्या पिढीजात ख्रिश्चनांना परत हिंदु धर्मात घेण्याची सुरुवात झाली.
१९७६: वि. स. खांडेकर यांना (ययाती कादंबरीसाठी) मराठीतील पहिला ज्ञानपीठ पुरस्कार प्रदान
१९७६: मराठीतील पहिला ज्ञानपीठ पुरस्कार वि. स. खांडेकर यांनी मिळाला
१९८४: 'इन्सॅट-१-इ' हा संपूर्ण भारतीय बनावटीचा बहुउद्देशीय भारतीय उपग्रह राष्ट्राला समर्पित
१९९५: बारिंग्ज बँक ही इंग्लंडची सर्वात जुनी गुंतवणूक बँक दिवाळखोरीत निघाली.
१९९८: परळी-वैजनाथ येथील औष्णिक केन्द्राने एका दिवसात १४.७०९ दशलक्ष युनिट विजेची निर्मिती करून वीजनिर्मितीचा (भारतातील व त्याकाळचा) नवा विक्रम नोंदवला.
१९९९: आशिया खंडातील पहिले तरंगते हॉटेल अशी ख्याती असलेले ठाण्याच्या घोसाळे तलावातील 'अभिरुची हॉटेल' आगीत भस्मसात झाले.
१९९९: आंतरराष्ट्रीय जनुक अभियांत्रिकी व जैवतंत्रज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञ प्रा. जी. पी. तलवार यांची मानाच्या समजल्या जाणार्या मास्त्रोनी-सीगल पुरस्कारासाठी निवड
२००६: रशिया आणि इराण यांच्यात अणुशक्ती संशोधन या विषयी तोडगा काढण्यात आला.
२००८: भारताने समुद्रातून सक्षम बैलिस्टिक मिसाइल ची चाचणी केली, जे मिसाईल अण्वस्त्रे घेऊन जाण्याची क्षमता ठेवते.
२०१९: आजच्या दिवशी पुलवामा हल्ल्याच्या १२ दिवसानंतर भारतीय वायुसेनेने पाकिस्तान मध्ये जाऊन आतंकवाद्यांचे लाँचपॅड उडवून टाकले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६३०: गुरू हर राय शिखांचे ७ वे गुरू (मृत्यू: ६ आक्टोबर १६६१)
१८०२: व्हिक्टर ह्यूगो - जागतिक कीर्तीचे फ्रेन्च कादंबईकार, कवी आणि लेखक (मृत्यू: २२ मे १८८५)
१८२९: लेव्ही स्ट्रॉस - अमेरिकन उद्योजक (मृत्यू: २६ सप्टेंबर १९०२)
१८६६: हर्बर्ट डाऊ - अमेरिकन उद्योगपती (मृत्यू: १५ आक्टोबर १९३०)
१८७४: सूरसिंह तख्तसिंह गोहिल ऊर्फ 'कलापि' - प्रसिद्ध गुजराथी (सौराष्ट्र) कवी, त्यांचा 'कलापिनो केकारव' हा काव्यसंग्रह खूप गाजला आहे. (मृत्यू: १९००)
१९०८: भारतीय लेखिका लीला मुजुमदार यांचा जन्म. (मृत्यू: ५ एप्रिल २००७)
१९२२: मनमोहन कृष्ण - चरित्र अभिनेता (मृत्यू: ३ नोव्हेंबर १९९०)
१९३७: मनमोहन देसाई - चित्रपट निर्माते, दिग्दर्शक (मृत्यू: १ मार्च १९९४)
१९४६: पत्रकार, लेखक, तसेच पद्मश्री पुरस्काराने सन्मानित असलेल्या मृणाल पांडे यांचा जन्म.
१९५७: भारतीय रिझर्व्ह बँक चे गवर्नर शक्तीकांत दास यांचा जन्म.
१९५९: लोकसभेचे सदस्य संजय शामराव धोत्रे यांचा जन्म.
१९८७: भारताच्या संविधान समितीचे सल्लागार बेनेगल नरसिंह राव यांचा जन्म.
१९९४: भारतीय कुश्तीपटू बजरंग पुनिया यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७१२: दिल्लीचा सातवा बादशाह बहादुर शाह (प्रथम) चे निधन.
१८७७: मेजर थॉमस कॅन्डी कोशकार व शिक्षणतज्ञ, मराठीत विरामचिन्हे वापरण्यास त्यांनी प्रथम सुरूवात केली, इंडियन पीनल कोडचे त्यांनी मराठीत भाषांतर केले. (जन्म: १३ डिसेंबर १८०४)
१८८६: नर्मदाशंकर दवे ऊर्फ 'नर्मद' गुजराथी लेखक व समाजसुधारक, त्यांनी गुजराथी भाषेचा शब्दकोश सर्वप्रथम तयार केला. (जन्म: २४ ऑगस्ट १८३३)
१८८७: भारतीय डॉक्टर - आनंदी गोपाळ जोशी यांचा जन्म. (जन्म: १५ मार्च १८६५)
१९०३: गटलिंग गन चे निर्माते रिचर्ड जॉर्डन गटलिंग यांचे निधन. (जन्म: १२ सप्टेंबर १८१८)
१९३७: एल. के. अनंतकृष्ण अय्यर - दक्षिण भारतातील जातिजमातींची सखोल पाहणी करुन माहिती गोळा करणारे मानववंशशास्त्रज्ञ (जन्म: ६ जुलै १८६२)
१९६६: महान क्रांतिकारक, प्रतिभासंपन्न कवी, नाटककार, प्रभावी वक्ते व लेखक स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे दीर्घ प्रायोपवेशनानंतर निधन (जन्म: २८ मे १८८३)
२०००: बा. म. तथा 'रावसाहेब' गोगटे - बेळगाव येथील उद्योगपती (जन्म:)
२००३: राम वाईरकर - व्यंगचित्रकार, महाराष्ट्रातल्या बालवाचकांना सुपरिचित असलेला फास्टर फेणे वाईरकर यांच्या कुंचल्यातून उतरला होता.
२००४: शंकरराव चव्हाण - केंद्रीय अर्थमंत्री, गृहमंत्री आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री (जन्म: १४ जुलै १९२०).
२००५: अमेरिकन संगणकशास्त्रज्ञ व मॅकिन्टॉश चे निर्माते जेफ रस्किन यांचे निधन. (जन्म: ९ मार्च १९४३)
२०१०: चंडीकादास - अमृतराव तथा नानाजी देशमुख - समाजसुधारक व संघप्रचारक, लोकसभा व राज्यसभा सदस्य, डी. लिट. (पुणे विद्यापीठ १९९७), पद्मविभूषण. त्यांनी रचनात्मक ग्रामीण विकासाला वेगळी दृष्टी दिली. डोमरी येथील सोनदरा गुरुकुलम, ग्रामोदय विश्वविद्यालय, उदयमिता विद्यापीठ, आयुर्वेद विद्याप्रतिष्ठान, गोमाता संगोपन प्रकल्प अशा विविध संस्थांमार्फत विधायक कार्यक्रमांचे जाळे त्यांनी विकसित केले. (जन्म: ११ आक्टोबर १९१६ कडोळी, परभणी, महाराष्ट्र).

# निर्लज्ज नगरपरिषद प्रशासनाची गुड मॉर्निंग ग्रुपने लाज राखली

## छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगणावरील तुटलेल्या जिमच्या साहित्याची स्वखर्चाने दुरुस्ती





बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगणांवर सकाळी आणि सायंकाळी व्यायाम करण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना नगरपरिषद प्रशासनाने बसवलेले साहित्य मोडकळीस आले होते यामुळे व्यायाम करणारांची हेळसांड होत होती. मोडकळीस आलेल्या जिमच्या साहित्याची दुरुस्ती करण्यात यावी यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रजासत्ताक दिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करून शासकीय ध्वजारोहणा साठी आलेले क्रिडा मंत्री दत्तात्रय भरणे यांना निवेदन दिले होते. निवेदन अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत नरेंद्र कुलकर्णी यांनी मुख्याधिकारी नगरपरीषद बीड यांना आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत लेखी कळवले होते. मात्र नेहमीप्रमाणेच नगरपरिषद प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले. व्यायामासाठी येणाऱ्या नागरिकांची हेळसांड लक्षात घेऊन ''गुड मॉर्निंग '' ग्रुपच्या सदस्यांनी सामाजिक बांधिलकी जपत पुढाकार घेत आणि स्वखर्चाने सगळया साहित्यांची दुरुस्ती करून घेतली.त्यामुळे एकंदरीतच निर्लज्ज नगरपरिषद प्रशासनाची गुड मॉर्निंग ग्रुपने लाज राखली अशी प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांनी दिली. गुड मॉर्निंग ग्रुपच्या या सामाजिक कार्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

बीड शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगणावर सकाळी आणि सायंकाळी नागरीकांची गर्दी असते.व्यायामाच्या दृष्टीने अनेक नागरिक याठिकाणी येतात.अशा नागरीकांसाठी व्यायाम करण्यासाठी काही वर्षापुर्वी ओपन जिमचे साहित्य बसविण्यात आले होते. या साहित्याची कित्येक महिन्यांपासून मोडतोड झालेली होती.अनेक साहित्य मोडकळीस आलेले होते. त्यामुळे व्यायामासाठी आलेल्या नागरीकांची हेळसांड होत होती. यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांच्या सहका-यांनी नगरपरिषद प्रशासनाला वारंवार लेखी निवेदन तसेच आंदोलनाद्वारे मोडकळीस आलेल्या साहित्याची दुरूस्ती करण्याची मागणी केली होती.मात्र नगरपरिषद प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले होते. गुड गुड मॉर्निंग ग्रुपच्या सदस्यांनी ही बाब लक्षात घेऊन सामाजिक बांधिलकी जपत स्वखर्चाने तुटलेल्या जिमच्या साहित्याची वेल्डिंगने दुरुस्ती केली.यासाठी अँड.चंदुभाऊ जटाळ, जयदत्त थोटे,शरद जवळकर, अँड.शिवाजी साळवे,राजुशेठ गोरे, घोगरे , संतोष पवार, दिनेश गुरखुदे, जितेंद्र कासट, आनंद बाहेती, किशोर कागदे,अलीमभाई, सुर्यवंशी, ढाकणे, अंकुश निर्मळ, अशोक सुरवसे, वानखेडे, मुकेश भस्मारे, कोठारी, मिसाळ,बाळु निकम,असत पटेल,राजु दळवी यांनी मोलाचे योगदान दिले.

# अवसायकांची नामतालिका (पॅनेल) साठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र सहकारी संख्या अधिनियम १९६० चे कलम १०२ अन्वये जिल्ह्यातील अवसायनातील संस्थांचे कामकाजासाठी अवसायकांची नामतालिका (पॅनेल) तयार करण्यासाठी खालोल व्यक्तिंकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.



न्यायालयातील निवृत्त न्यायाधीश आणि सेवानिवृत्त विधी अधिकारी, प्रक्टीसिंग ॲडव्होकेटस, चार्टर्ड अकौन्टट, कॉस्ट अकौन्टट,कंपनी सेक्रेटरी, राष्ट्रीयकृत बँका, ग्रामीण बँका, भूविकास बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, व्यापारी बँका, नागरी सहकारी बँका, राज्य सहकारी बँका यांचे सेवेतील व्यवस्थापक दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेले सेवानिवृत अधिकारी, सहकार विभागातील सेवानिवृत वर्ग-१, वर्ग-२ दर्जाचे अधिकारी आणि सहकार अधिकारी प्रथम श्रेणी व द्वितीय श्रेणी दर्जाचे कर्मचारी, महसूल विभागातील सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी दर्जाचे अधिकारी, कंपनी लिक्विडेटर म्हणून कामकाज केलेले अनुभवी व्यक्ती, सहकारी संस्थेचे लेखापरिक्षण केले असल्याचे ०५ वर्षाचे अनुभवी प्रमाणित लेखापरिक्षक.

सदर व्यक्तीवर कोणत्याही स्वरुपाचे गुन्हे दाखल नसावेत.शासकीय सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी असल्यास त्यांची कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू नसावी व सेवेत कोणताही ठपका ठेवलेला नसावा, वर्यामर्यादा ७० वर्षापर्यंत असावी. शारीरीक व मानसिक आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा.प्रॅक्टीसिंग ॲडव्होकेटस व चार्टर्ड अकौन्टट, कॉस्ट अकौन्टट, कंपनी सेक्रेटरी यांना सहकारी संस्थेचे कामकाजाचा ०५ वर्षाचे अनुभव असणे आवश्यक आहे. कोणत्याही सहकारी संस्थेचा थकबाकीदार नसावा किंवा कलम ८३ व कलम ८८ च्या कार्यवाहीमध्ये जबाबदार धरलेला नसावा (महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियमांतर्गत अपात्र नसावा) सदर व्यक्तीचा सहकार खात्याने काळ्या यादीमध्ये मध्ये समाविष्ट केलेला नसावा.सदर व्यक्ती संबंधीत विभागाच्या विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था कार्यालयाच्या अधिपत्याखाली येणाऱ्या जिल्ह्यातील रहिवासी असावा. (लातूर, उस्मानाबाद, बीड य नांदेड जिल्ह्यातील) सदर व्यक्ती एकावेळी एकाच जिल्ह्यातून अर्ज दाखल करु शकेल.

अर्जाचे विहीत नमुने विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर विभाग लातूर, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, लातूर यांच्या कार्यालयात दिनांक २५ फेब्रुवारी १४ मार्च २०२५ या कालावधीत कार्यालयीन वेळेत मिळू शकतील. अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दिनांक १४ मार्च २०२५ पर्यंत राहील. प्राप्त अर्जाची छाननी दिनांक २० मार्च २०२५ रोजी पूर्ण करुन, दिनांक २१ मार्च २०२५ पर्यंत प्रारुप नामतालिका प्रसिध्द करणे व दि.२५ मार्च २०२५ हरकती मागवणे व दि.२७ मार्च २०२५ रोजी हरकतीचा निर्णय करुन दि.२८ मार्च २०२५ रोजी अंतिम नामतालिका प्रसिध्द करण्यात येईल. याबाबतची जाहीर सूचना या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आलेली असल्याचे विभागीय सहाय्यक निबंधक, अधिन विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था लातूर यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# दोन मोठ्या झाडांच्या फांद्यांमुळे ऐतिहासिक कारंजा टॉवरला धोका

## बीड नगर परिषद साध्या फांद्या छाटू शकत नाही का?

बीड । प्रतिनिधी

शहराच्या मध्यभागी असलेल्या ऐतिहासिक कारंजा टॉवर ला जवळच असलेल्या दोन मोठ्या झाडांच्या फांद्यांमुळे धोका निर्माण झाला आहे. असे असताना देखील त्या फांद्या छाटल्या जात नाहीयेत. म्हणून बीड नगर परिषद साध्या फांद्या छाटू शकत नाहीत का? असा उद्विग्न प्रश्न मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेशराव गंगाधरे यांनी उपस्थित केला आहे.

ऐतिहासिक कारंजा टॉवरला बीड नगर परिषदेच्या तसेच जिल्हा प्रशासनाच्या अनास्थेमुळे, हलगर्जीपणामुळे, दुर्लक्षतेमुळे मोठ्या प्रमाणात अवकळा आली आहे. ही ऐतिहासिक वास्तू दुर्दशेत अडकली आहे. मात्र याकडे प्रशासकीय स्तरावर बघितलेच जात नसल्याने ही ऐतिहासिक वास्तू दारिद्र्याच्या फेऱ्यात अडकली आहे. म्हणून याविषयी १४ फेब्रुवारी २०२५ रोजी निवेदन ही देण्यात आले आहे. तरीसुद्धा प्रशासनिक स्तरावर दखल घेतली जात नाही. हे चित्र पाहता कारंजा टॉवर परिसराजवळ तसेच अजिजपुरा आणि खंदक येथील ज्येष्ठ नागरिकांनी पुढे येत तरुणांना सोबत घेऊन कारंजा टॉवरच्या आवारातील सर्व घाण कचरा उचलून स्वच्छता केली. पाण्याच्या फवाऱ्यासाठी लावण्यात आलेल्या कारंजाच्या हौदालाही साफसूफ केले. कारंजा टॉवरचे सर्व आवार आणि हौद पाण्याने धुवून काढण्यात आले. जाहिरातीच्या डिजिटल फलकासाठी लावण्यात आलेले लोखंडी फ्रेम काढण्यात आले. नागरिक स्वतः पुढे येऊन करत असलेले हे कार्य सुद्धा प्रशासनाला दिसत नाही असे वाटते. म्हणूनच की काय प्रशासनाकडून अजूनही कारंजा टॉवरसाठी आवश्यक असलेली कामे केली जात नाहीत. जवळच असलेल्या दोन मोठ्या झाडांच्या फांद्या मोठ्या प्रमाणात कारंजा टॉवरला चिटकल्या असून त्याच्या दाबाने तसेच वारा सुटल्यास होणाऱ्या घर्षणाने कारंजा टॉवरच्या इमारतीला धोका निर्माण झाला आहे. परंतु बीड नगर परिषदेसह जिल्हा प्रशासनालाही याच्याशी काहीही देणे घेणे असल्याचे दिसत नाही. येथील दोन्ही झाडांच्या कारंजावर लोंबकळणाऱ्या फांद्या छाटणे आवश्यक असताना त्या छाटल्या जात नाही. म्हणून मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेशराव गंगाधरे यांनी बीड नगर परिषद या फांद्या सुद्धा छाटू शकत नाही का? असा उद्विग्न प्रश्न उपस्थित केला आहे.

# बोर विकून मुलाला केले नोकरदार!

## सारूळच्या शेतकऱ्याच्या कष्टाचे चीज

बीड। प्रतिनिधी

केज तालुक्यातील सारूळ येथील शेतकऱ्याने शेतात पिकविलेल्या बोराची विक्री करून मुलाचे शिक्षण पदवीपर्यंत केले. तोच मुलगा आज नोकरीला लागला असून शेतकऱ्यांच्या कष्टाचे चीज झाले आहे बोर विक्रीतून मुलाला नोकरदार केल्याने परिसरातून या शेतकऱ्याचे कौतुक होत आहे.

केस तालुक्यातील सारूळ येथील अशोक ढाकणे हे गरीब शेतकरी असून संसाराचा गाडा ओढताना किती मेहनत घ्यावी लागते याचे जिवंत उदाहरण अशोक ढाकणे यांच्याकडे पाहिल्यानंतर दिसून येते. जेमतेम शेती आणि शेतीवरच उदरनिर्वाह अशी परिस्थिती आहे मुलाचे शिक्षण संसाराचा खर्च भागवितांना त्यांना नको ती कष्ट करावी लागली शेतात असलेल्या बोरीच्या झाडाची बोर बाजारात विकून मुलाच्या शिक्षणाला ते हातभार लावत. मुलानेही प्राथमिक शिक्षण ग्रामीण भागात व त्यानंतरचे अतिशय जिद्दीने केज येथील यशवंतराव कराड महाविद्यालयात शिक्षण घेतले अनेक परीक्षा दिल्या स्पर्धा परीक्षेची ही तयारी केली मात्र यश मिळत नव्हते, त्यानंतर आत्ताच नुकत्याच झालेल्या आरोग्य सेवक भरती मध्ये जळगाव महानगरपालिकेमध्ये त्याची आरोग्य सहाय्यक म्हणून नियुक्ती झाली आहे. वडिलांनी अतिशय कष्टातून आर्थिक तडजोडी करून मुलाच्या शिक्षणाला हातभार लावला बोर विकली शेती केली संसार आणि शिक्षण या दोन्हीही स्तरावर त्यांनी लक्ष देऊन खर्च केला. मुलाला शिक्षणासाठी स्वातंत्र्य दिले. त्यामुळेच शिक्षणात मुलाने प्रगती केली. त्याचाच प्रत्यय मुलगा गणेश ढाकणे याला आला असून त्याची आरोग्य सहाय्यक पदी निवड झाली आहे. या निवडीने केज परिसरातील नागरिकांनी त्याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. ग्रामीण भागात तील विद्यार्थी असूनही चांगले शिक्षण घेतल्यानंतर यश मिळू शकतेच हेच गणेश ढाकणे यांनी सिद्ध करून दाखवले आहे, याचा आदर्श इतर विद्यार्थ्यांनीही घेतलेस यश जास्त दूर जाणार नाही अशी प्रतिक्रिया ग्रामीण भागातून व्यक्त होत आहे.



# मराठवाड्याच्या 'माय आणि माती'ने दिल्ली गाजवली

बीड : । प्रतिनिधी

दिल्ली येथील ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात दि.२२ रोजी निमंत्रित कवीसंमेलनात शिरूरचे कवी डॉ. विठ्ठल जाधव यांची 'माय आणि माती' ही कविता प्रचंड गाजली. मराठी साहित्य रसिकांनी संपूर्ण सभागृहात टाळ्यांचा गजर केला. वे९८ अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, तालकटोरा स्टेडीयम, दिल्ली येथे दि.२१ ते २३ रोजी झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुख्य सभामंडपात कवी इंद्रजीत भालेराव यांच्या अध्यक्षतेत निमंत्रितांच्या कवीसंमेलनात माय आणि माती यांचा संबंध अतूट असतो.

माय माती होते, माती माय होते. या ओळींनी उपस्थितांच्या काळजात जागा निर्माण केली. रसिकांच्या मनात घर करणारी कविता माय आणि माती डॉ. विठ्ठल जाधव यांनी सादर करताच खचाखच भरलेल्या संपूर्ण सभागृहात अक्षरशः टाळ्यांचा पाऊस पडला. मराठवाड्याची माय आणि मातीने दिल्लीचे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन गाजविले. मराठवाडा विभागातील इंद्रजीत भालेराव (परभणी), महेश मोरे (नांदेड), शैलजा कारंडे (लातूर), बापू दासरी(नांदेड), बाळ पाटील (धाराशीव), रसिका देशमुख यांनीही सरस कवितांचे सादरीकरण केले. संमेलनाध्यक्षा तारा भवाळकर, अ.भा. मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा उषा तांबे, डॉ. दादा गोरे, मसापचे अध्यक्ष कौतिकराव ठाले पाटील, अशोक नायगावकर, देवीदास फुलारी, एकनाथ आव्हाड, रामचंद्र काळुंखे, प्रभाकर शेळके, किरण सगर, कुंडलिक अतकरे यांची उपस्थिती रसिकांमध्ये होती.

# चारचाकी वाहन चोरी करणारे दोघे पकडले

जालना । प्रतिनिधी

५ फेब्रुवारी रोजी विठ्ठल पंढरीनाथ गायके यांच्या राहत्या घरासमोरुन ऋऋषीकेश बळीराम वायभट्ट रा. भिवंडी बोडखा, ता. अंबड जि. जालना यांचे मालकीची क्रुझर वाहन क्र. २१८८३० हे ४,२०,०००/- रु किंमतीची कोणीतरी अज्ञात इसमाने चोरी करुन नेली आहे. त्यामुळे अज्ञात आरोपी विरुद्ध पोलीस ठाणे अंबड जालनां येथे गु.र.नं. ६६/२०२५ कलम ३०३(२) भा.न्या. संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता

त्यानुषंगाने मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बंसल यांनी गुन्हा उघडकीस आणणेबाबत पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, स्थानिक गुन्हे शाखा, जालना यांना सुचना दिल्या होत्या. सदर माहितीच्या अनुषंगाने चारचाकी



वाहन चोरांची तांत्रिक व गुप्तबातमीदारामार्फत माहिती घेत असतांना माहिती मिळाली की, सदर गुन्हा हा आरोपी अब्दुल रहिम अब्दुल करीम ऊर्फ बाबा वय-५३ वर्ष, रा.दिलावरनगर, बीड व अकबर हसन शेख ऊर्फ सुलतान, वय-३८ वर्ष, रा.केज, जि.बीड ह.मु. म्हाडा कॉलनी, महाराणा प्रतापनगर, लातुर यांनी मिळून केला आहे. त्याअनुशंगाने दोन्ही आरोपीतांना अनुक्रमे बीड व लातुर याठिकाणाहुन ताब्यात घेऊन त्यांचेकडे गुन्हयाच्या अनुषंगाने चौकशी करता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली देऊन गुन्हयातील क्रुझर जीप ही कलबुर्गी, राज्य कर्नाटक येथे येथील इसम सुशील सिधरामप्पा पांचाळ, रा. कलबुर्गी, राज्य कनार्टक याचे कडे कलरिंग करणेसाठी ठेवलेली असल्याचे सांगितल्याने सदरची क्रुझर जीप ही इसम सुशील सिधरामप्पा पांचाळ, रा. कलबुर्गी, राज्य कनार्टक याचे कडुन जप्त करण्यात आली आहे.

# ॲड. संध्या सोनवणे यांच्या उपस्थितीत सभासद नोंदणी अभियानाला प्रतिसाद

बीड । प्रतिनिधी

राज्यातील युवती महिला भगिनी सुरक्षित राहाव्यात यासाठी राष्ट्रवादी युवती काँग्रेस काम करत असून पक्षाच्या माध्यमातून युवतींच्या समस्या सोडवण्यासाठी कायमच युवतींसोबत असल्याचे युवती जिल्हाध्यक्ष प्रिया डोईफोडे यांनी सांगितले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या आदेशावरून पक्ष बांधणीसाठी राज्यात सभासद नोंदणी अभियान राबविण्यात येत आहे. बीड जिल्ह्यात देखील मोठ्या प्रमाणात सभासद नोंदणी अभियान राबविण्यात येत आहे. बीड शहरातील यशवंतराव चव्हाण पॉलिटेक्निक महाविद्यालय, बार्शी रोड येथे युवती काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष ॲड.संध्या सोनवणे यांच्या प्रमुख उपस्थितीत युवती सभासद नोंदणी अभियान राबविण्यात आले.

राष्ट्रवादी युवती काँग्रेस बीड जिल्हाध्यक्ष प्रिया डोईफोडे यांनी राष्ट्रवादी युवती काँग्रेस प्रदेशाध्यक्ष संध्या सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी युवती काँग्रेस च्या बीड जिल्हाध्यक्ष प्रिया डोईफोडे यांनी शहरातील यशवंतराव चव्हाण पॉलिटेक्निक महाविद्यालय मध्ये सभासद नोंदणी अभियानाचे आयोजन केले होतें. या मध्ये शेकडो युवतीने मोठ्या प्रमाणात सभासद नोंदणी करत अभियानाला




चांगला प्रतिसाद दिला. यावेळी राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षा ॲड.संध्या सोनवणे यांनी महाविद्यालयातील विद्यार्थिनींशी संवाद साधला. यावेळी बोलताना म्हणाल्या की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजित दादा पवार यांच्या आदेशावरून राज्यभरात युवती सभासद नोंदणी अभियान राबविण्यात येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा सर्वांना सोबत घेऊन जाणारा पक्ष आहे. त्यात प्रामुख्याने युवती, महिला भगिनी साठी सतत काम करत आहे. राज्यातील मुली शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून अजित दादा पवार यांच्या पुढाकारातून राज्य सरकार अनेक योजना राबवत आहे. या योजना राबवत असताना युवतींनी देखील याचा लाभ घेतला पाहिजे. लाडकी बहीण योजना यासह अनेक योजना महिलांसाठी सुरू आहेत त्याचा देखील युवतींनी अभ्यास करणे गरजेचे आहे. युवतींनी आपल्या आणि अडचणी समस्या सोडविण्यासाठी राष्ट्रवादी व ती काँग्रेस पक्षात सभासद व्हायला पाहिजे. विद्यार्थिनींनी चांगले शिक्षण घेऊन आई वडिलांचे नाव मोठे करावे. त्यांचा आदर करावा त्यांना आपले मित्र समजून त्यांच्याशी संवाद साधावा आपल्या भावना व्यक्त कराव्यात. कारण आजच्या सोशल मीडियाच्या जगात आपल्या माणसाशी संवाद खूप कमी झाला आहे. संवाद कमी होत असल्याने अनेक वेळा चुकीचे निर्णय घेतले जातात. स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्या. शहरातील जिल्ह्यातील राज्यातील युवती सुरक्षित रहावी म्हणून आम्ही काम करत आहोत. पक्षाच्या माध्यमातून आम्ही कायमच युवतींच्या सोबत आहोत. बीड जिल्ह्यातील प्रत्येक कॉलेज मध्ये सभासद नोंदणी अभियान राबविणार आहोत. राज्य, केंद्र शासनाच्या योजना तुमच्यापर्यंत पोहचविण्यासाठी ही सभासद नोंदणी करण्यात येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस आणि अजित दादा पवार यांचे पेज पाहत जा विविध नेत्यांचे यामध्ये सरकार काय काय काम करत कोण कोणत्या योजना राबवत आहेत याची माहिती घेत जा असे आवाहन देखील ॲड.संध्या सोनवणे यांनी सर्व विद्यार्थिनींना केले. यावेळी युवती पदाधिकारी नुजत सिद्दिकी, शिवकन्या वीर, आम्रपाली वडमारे , आनीता मस्के, आरती पिल्ले, शालिनी परदेसी महिला जिल्हा कार्याध्यक्ष,शितल धोंडरे महिला जिल्हा सरचिटणीस, अजिंक्य आणेराव विद्यार्थी जिल्हाध्यक्ष, शुभम कथांगळे विद्यार्थी शहर जिल्हाध्यक्ष, सचिन जाधव युवक शहराध्यक्ष, माजेद कुरेशी अल्पसंख्याक शहराध्यक्ष,साजेद जागीरदार, नितीन जोगदंड, कॉलेजचे प्राचार्य मरळफल्ले सर उपस्थित होते.

# नागरिकांनी मूलभूत कर्तव्याचीही जाणीव ठेवावी-डॉ. बापू घोलप



परळी । प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्थेच्या कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयांमध्ये राज्यशास्त्र विभागाच्या वतीने एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली यावेळी भारतीय संविधानातील मूलभूत हक्क आणि कर्तव्य या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. बापू घोलप हे बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ लालासाहेब घुमरे, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ काकासाहेब पोकळे, प्रा कळंबे सर, प्रा गिरे सर इत्यादींची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. घोलप म्हणाले की, भारतीय नागरिक आपल्या हक्कासाठी संविधानाकडे बोट दाखवितात आणि शासनाकडून मूलभूत हक्कांची आग्रहाने मागनी करतात. मात्र संविधानाने सांगितलेली भारतीय नागरिकांची मूलभूत कर्तव्य मात्र विसरतात त्यामुळे सजग आणि सुज्ञ नागरिक म्हणून आपली जबाबदारी ते विसरतात असे मत त्यांनी व्यक्त केले कार्यक्रमाचा अध्यक्ष समारोप करताना डॉ लालासाहेब घुमरे यांनी भारतीय संविधान अर्थात राज्यघटनेची मूलभूत ओळख करून घेण्यासाठी सोशल मीडिया आणि इंटरनेटचा वापर करावा व राज्यघटने विषयी आदर बाळगावा अशी अपेक्षा व्यक्त केली कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन डॉ काकासाहेब पोकळे यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रा कळंबे यांनी व्यक्त केले. प्राचार्य डॉ मधुकर आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या या एकदिवसीय कार्यशाळेसाठी बीए बीकॉम व बीएससीच्या विद्यार्थ्यांची उपस्थिती होती

# परळीत पशुवैद्यक पदवी महाविद्यालय स्थापन करण्यास मंत्रिमंडळाची मंजुरी



## ५६४.५८ कोटी निधीची तरतूद; परळीचे प्रगतीच्या वाटेवर आणखी एक विश्वासात्मक पाऊल – धनंजय मुंडे



### धनंजय मुंडे यांनी मानले मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री तसेच पशू संवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांचे आभार

**परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी**

**राज्य मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत परळी विधानसभा मतदारसंघात नवीन पशुवैद्यक पदवी महाविद्यालय स्थापन करण्यास मंजुरी देण्यात आली असून यासाठी ५६४.५८ कोटी रुपये निधीची तरतूद करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.**

याबद्दल परळीचे आमदार तथा अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे तसेच पशू संवर्धन मंत्री तथा त्यांच्या भगिनी पंकजाताई मुंडे यांचे आभार मानले आहेत.

परळी मतदारसंघात कृषी महाविद्यालय, कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, सोयाबीन संशोधन व प्रक्रिया केंद्र, सीताफळ इस्टेट इत्यादी शासकीय शिक्षण - प्रशिक्षण संस्था याआधी धनंजय मुंडे यांच्या कृषी मंत्री कार्यकाळात मंजूर करण्यात आलेल्या आहेत. त्यापाठोपाठ पशुवैद्यक पदवी महाविद्यालय मंजूर झाल्याने हे प्रगतीच्या वाटेवर आणखी एक विश्वासात्मक पाऊल ठरणार असल्याचे धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे.

दरम्यान धनंजय मुंडे हे सध्या बेल्स पाल्सी नामक आजाराने ग्रस्त असून उपचार घेत आहेत. या आजारामुळे वेदना व बोलण्यास त्रास होतो, त्यामुळे ते आजच्या मंत्रिमंडळ बैठकीस उपस्थित नव्हते.

# जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६ अंतर्गत ४३६ कोटी नियतव्यय मंजूर

**जालना । प्रतिनिधी**

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५-२६ करीता जिल्ह्यांनी सादर केलेल्या प्रारुप आराखड्यांना मान्यता देण्यासाठी तसेच त्यास अंतिम स्वरुप देण्यसाठी उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हानिहाय राज्यस्तरीय बैठकांचे आयोजन दि. ३ फेब्रुवारी, २०२५ ते ११ फेब्रुवारी, २०२५ या कालावधीत करण्यात आले होते. राज्यस्तरीय बैठकीमध्ये आपल्या जिल्ह्याकडून करण्यात आलेल्या सादरीकरणानंतर जिल्हा योजनेचा नियतव्यय अंतिम करतांना, कार्यान्वयीन यंत्रणांची मागणी, जिल्ह्याचे वैशिष्ट्य, गरजा तसेच शासनाची प्राथमिकता इ. बाबी विचारात घेऊन जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५-२५ करीता जालना जिल्ह्यासाठी एकूण रुपये ४३६ कोटी रुपयांचा नियतव्यय मंजूर करण्यात आला. सन २०२४-२५ करीता जिल्ह्यासाठी ३९० कोटी नियतव्य मंजूर झाला होता. सन २०२४-२५ करीता मंजूर नियतव्य अंतर्गत नागरी भागासाठी विशेष अतिरिक्त नियतव्यय रुपये २२.४१ कोटी रुपयांचा वापर करण्यात येणार आहे. तसेच बदनापूर आणि परतूर या आकांक्षित दोन तालुक्याकरीता प्रत्येकी ५-५ कोटी नियतव्यय शासनाने अंतिमत: मंजूर केला असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली.

राज्यात गतीने होत असलेले नागरीकरण लक्षात घेवून सर्व जिल्ह्यांना नागरीकरणाच्या प्रमाणात जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत सर्व महानगरपालिका/नगरपालिका/ नगरपंचायती यांना विशेष अतिरिक्त नियतव्यय ( ) उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता विचारात घेऊन, सन २०२५-२६ या वर्षाकरीता आपल्या जिल्ह्यास मंजूर रुपये ४३६ कोटी अंतिम नियतव्ययापैकी रुपये २२.४१ कोटी इतका नागरी भागासाठीचा विशेष अतिरिक्त नियतव्यय मंजूर करण्यात आला आहे. या विशेष अतिरिक्त नियतव्ययाचा वापर आपल्या जिल्ह्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ''जनगणना-२०११'' च्या लोकसंख्येच्या प्रमाणात नागरी भागाच्या विकास कामांसाठी करण्यात येणार आहे. निती आयोगाकडून जिल्ह्यातील ''बदनापूर व परतूर'' हे तालुके आकांक्षित तालुके म्हणून घोषित करण्यात आले आहेत. आकांक्षित तालुक्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रति तालुका रुपये ५ कोटी याप्रमाणे रुपये १० कोटी इतका निधी एक विशेष बाब म्हणून देण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली आहे.

# ह.भ.प. महामंडलेश्वर स्वामी १००८ त्रिवेंद्रानंद सरस्वतीजी यांचे श्रीसंत भगवानबाबा प्रतिष्ठानवर आज कीर्तन

**बीड । प्रतिनिधी**

येथील श्रीसंत भगवानबाबा सामाजिक प्रतिष्ठानवर प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी सर्वधर्म समभाव राष्ट्रीय एकात्मता अखंड



हरिनाम सप्ताह गुरुवार दि.२० फेब्रुवारी २०२५ पासून प्रारंभ झाला आहे. सप्ताहात सोमवार दि.२६रोजी महाशिवरात्रीच्या शुभप्रवावर श्री श्री श्री १००८ महास्वामी शिवरुद्रानंद महाराज, काशी यांचे दुपारी ४.०० वा. प्रवचन तर रात्री ६.३० ते ८.३० वाजता ह.भ.प. १००८ महामंडलेश्वर स्वामी त्रिवेंद्रानंद सरस्वतीजी महाराज, गणेशानंदगड इंदुवासीनी, संस्थान पिंपळनेर, यांचे कीर्तन होणार आहे.

कीर्तनाच्या नंतर दरदिवशी भोजन प्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहातील कीर्तन, प्रवचन कार्यक्रमाचा व भोजन प्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीसंत भगवानबाबा सामाजिक प्रतिष्ठान सप्ताह समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# पाटोद्यात स्वस्त धान्य दुकानात गव्हाऐवजी खराब ज्वारी

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यात असणाऱ्या स्वस्त धान्य दुकानात फेब्रुवारी महीन्यात गव्हा ऐवजी ज्वारी आली असुन ज्वारी ही अंत्यत खराब असुन तरी याची जिल्हपुरवठा अधिकारी यांनी चौकशी करावी अशी मागणी होत आहे. याबाबत तालुक्यातील बहुतांशी गावातील नागरीक हे उसतोडणीसाठी गेली होती





आता परतु लागले असुन पाटोदा पुरवठा विभागाकडुन फेब्रुवारी महीन्यात स्वस्त धान्य दुकानात गहु ऐवजी ज्वारी आली असुन ती अंत्यत खराब असुन या पोत्याला जाळ्या लागल्या आहेत. याबाबत पुरवठा विभाग मात्र दुर्लक्ष करत असुन याकडे तहसिलदार यांनी लक्ष देवुन नागरीकाना चांगली. ज्वारी उपलब्ध करून दयावी .व त्याचप्रमाणे ही खराब ज्वारी नेमकी कोठुन व कसी आली याची चौकशी जिल्हापुरवठा अधिकारी व तहसिलदार यांनी करण्यात यावी व दोषीवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी होत आहे.

# जयंत केजकर यांचे बहारदार गायन



अंबाजोगाई । प्रतिनिधी

संगीत साधना मंचच्या वतीने आयोजित बारावी मासिक शास्त्रीय संगीत सभा उत्साहात संपन्न झाली.

पुणे येथील गायक जयंत केजकर यांच्या बहारदार गायनाने सर्व रसिक मंत्रमुग्ध झाले. संगीत शिकणाऱ्या सर्व संगीत साधकांसाठी जयंत केतकर यांचे गायन एक आदर्श सादरीकरण झाले. मारवा रागाची घराणेदार विलंबित ख्याल मांडणी,त्यानंतर खमाज रागात डौलदार बंदिश आणि नाट्यगीत सादर झाले.पहाडी राग अंगाचे सुंदर भजन गाऊन भैरवी तील अप्रतीम बंदिशी ने मैफिलीची सांगता झाली. यांना तबल्यावर महेश साळुंके यांनी तर संवादिनीवर विश्वजीत धाट यांनी साथसंगत केली. या सभेसाठी रसिक श्रोते इतर मान्यवर उपस्थित होते.

# घरासमोर कबूतर बसण्यावरून वाद; तिघांवर ॲट्रॉसिटीसह मारहाणीचा गुन्हा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**क्रांती नगर येथे किरकोळ कारणावरून एका महिलेवर जातीवाचक शिवीगाळ करत मारहाण केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी शेख मूसा शेख मेहबूब, शेख मखदुम व शेख नूरझा मेहबूब यांच्या विरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

तक्रारदार मनिषा अजय कसबे (वय ३०) या आपल्या कुटुंबासह क्रांती नगर येथे राहतात. काल (दि. २१ फेब्रुवारी २०२५) सायंकाळी ६:३० वाजता त्या आपल्या सासू शकुंतला कसबे व मुलगा यशराज यांच्यासोबत घरी असताना शेख मूसा शेख मेहबूब यांच्या कबुतरांनी त्यांच्या घरासमोरील लाकडी आडूवर आश्रय घेतला. त्याच ठिकाणी तक्रारदार महिलेचेही कबुतर होते. शेख मूसा कबूतर पकडण्यासाठी त्यांच्या घरासमोर आला व कबूतर परत मागू लागला. त्यावेळी मनिषा कसबे यांनी त्याला थांबण्यास सांगितले. मात्र, त्याने त्यांच्या घरात जबरदस्तीने प्रवेश केला. महिलांनी यास आक्षेप घेतला असता त्याने शिवीगाळ करत अरेरावीची भाषा वापरली. त्यानंतर त्याने आपल्या भावाला व आईला फोन करून बोलावले.शेख मूसा, त्याचा भाऊ शेख मखदुम आणि आई शेख नूरझा यांनी मिळून मनिषा कसबे यांना जातीवाचक शिवीगाळ करत मारहाण केली. तसेच त्यांची सासू शकुंतला कसबे व मुलगा यशराज कसबे यांनाही मारहाण करण्यात आली. आरोपींनी जातीवाचक अपशब्द वापरत त्यांना परिसरातून हाकलून लावण्याची धमकी दिली. यावेळी गल्लीतील नागरिकांनी मध्यस्थी करत भांडण सोडवले. जखमींना तातडीने रुग्णालयात नेण्यात आले. त्यानंतर मनिषा कसबे यांनी पोलीस ठाण्यात हजर राहून तक्रार दाखल केली. पोलिसांनी शेख मूसा, शेख मखदुम आणि शेख नूरझा यांच्याविरोधात संबंधित कलमांन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल चोरमले करत आहेत.

# स्वत:चे आत्मबल जागृत ठेवल्यास जगात अशक्य काही नाही -निलेश पाटील

**बीड । प्रतिनिधी**

शिक्षणतीर्थ संस्कृती विद्यालय व विवेकवर्धिनी गुरुकुलाचा पालक मेळावा व स्नेहसंमेलन नुकतेच पार पडले. गुरुकुलाचा पालक मेळावा हा वैशिष्ट्यपूर्ण असतो.या कार्यक्रमाला ३०० विद्यार्थ्यांचे पालक नातेवाईक इतर संस्थांचे प्रतिनिधी सामाजिक क्षेत्रातील लोक पत्रकार उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाज भूषण नितीन कोटेचा होते.



या कार्यक्रमात पालकांना मार्गदर्शन करताना वर्धा येथील आरटीओ इन्स्पेक्टर निलेश संजय पाटील यांनी स्वत:चे ध्येय प्रत्येकाने ठरवलं पाहिजे व ते ध्येय पूर्ण करण्यासाठी खूप अडचणी येतात परंतु त्याचा सामना करून आपले आत्मबल जागृत ठेवून कार्य केले तर नक्कीच अपेक्षित यश आपल्याला मिळवता येते असे प्रतिपादन केले.

सामान्यातून असामान्य व्यक्तिमत्व घडलेली आपण समाजामध्ये बघतो. सर्व भौतिक सुविधा असल्या तरच माणूस मोठं काम करू शकतो असं नाही तर ध्येयावरची निष्ठा हे काम पूर्ण करून घेते याचे उदाहरण म्हणजे बालविकास सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ . दत्ता नलावडे यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये बालविकासाच जे काम चालू केल आहे ते कौतुकास्पद आहे व येणाऱ्या काळात या गुरूकुलाला कोणतीही मदत लागेल ती मदत आपण करू व इतरांनाही यासाठी प्रवृत करू असे आवाहन पाटील यांनी केले. यावेळी मंचावर नितीन कोटेजा, गोरक्षनाथ आबुज, इंद्रसेन गोरे , डॉ . प्रदीपकुमार उजेगर, डॉ. दत्ता नलावडे मुख्याध्यापिका अर्चना जाणवळे उपस्थित होत्या.



बीड - शहरातील कै. शिवाजी धांडे नगर भागातील छत्रपती कॉलनी येथे आ.संदीप क्षीरसागर यांनी सिमेंट रस्ता व नालीबांधकामाचे उद्घाटन केले. तसेच याच भागात मोठ्या नाल्याचे काम सुरू आहे, त्याचीही आ.क्षीरसगरांनी पाहणी केली व काम दर्जेदार करण्याबाबत संबंधितांना सूचना दिल्या.

# वाळूचा टिप्पर दंड भरण्यासाठी नायब तहसीलदार घेऊन गेले -पो.उप. नि. गुरले

अंबड । प्रतिनिधी

अंबड उपविभागीय अधिकारी व पथक यांनी३१ जानेवारी रोजी पाचोड रोडवरील दोन बरस वाळू असलेलं टिप्पर विना रॉयल्टी पकडण्यात आलं होतं सदरील टिप्पर अंबड तहसील आवारामध्ये लावण्यात आलं होतं सदरील टिप्परवर गुन्हा दाखल असल्या कामी व तपास कामे करता अंबड पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक व इतर पोलीस यांनी अंबड तहसील मधून टिप्पर ताब्यात घेण्यात आले तसेच सदरील वाहनांमधून वाळू खाली करून तपास कामी पोलीस घेऊन गेले होते तपास काम पूर्ण झाल्यानंतर अंबड तहसीलचे नायब तहसीलदार श्री विवेक उढाण यांच्या ताब्यात देण्यात आले होते अशी माहिती पोलीस उप निरीक्षक अमोल गुरले यांनी दिली याप्रकरणी सविस्तर माहिती अशी की पोलिसांनी सदरील रिकामा वाहन तहशील कार्यालयामधून तपास काम करता येऊन गेले होते त्यानंतर तपासणी झाल्यानंतर टिप्पर चालक, तहसीलचे कर्मचारी यांच्या ताब्यात देण्यात आले होते. दंड भरून घेतला का नाही यासंदर्भात आम्हाला काही माहिती नाही असे पोलीस प्रशासनाकडून सांगण्यात आले. हा सगळा प्रकार अंबड तहसील कार्यातील सीसीटीव्ही मध्ये असू शकतो.

३१.०१.२०२५ रोजी सकाळी ०६.०० वाजता मा. उपविभागीय अधिकारी ◀◀ पान ३ वर

# सागर धस यांच्या उपस्थितीत ह.भ.प.रामकृष्ण रंधवे (बापू )यांच्या हस्ते लोकसेवा हास्पिटलचे उद्घाटन

**पाटोदा । प्रतिनिधी**

कोरोनाच्या भयावह परीस्थिती नंतर ''रुग्ण सेवा हिच ईश्वर सेवा''हेच खरे ब्रीद वाक्य झाले असून पाटोदा सारख्या ग्रामीण भागात एम.डी पदवी प्राप्त डॉ. पठाण यांनी रुग्णांना सर्व सुविधा युक्त लोकसेवा हॉस्पिटल सुरू केले असुन हे खुप अभिमानास्पद आहे. या हॉस्पिटलच्या माध्यमातून डॉ. पठाण यांनी रुग्णांना २४ तास सेवा उपलब्ध करावी असे आवाहन युवानेतृव सागर आप्पा धस यांनी केले ते पाटोदा येथे लोकसेवा हॉस्पिटलच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.



पाटोदा येथील बाजार तळ येथे नुतन लोकसेवा हॉस्पिटलचे उद्घाटन आष्टी पाटोदा शिरूर मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांचे चिरंजीव सागर आप्पा धस व जमाते आमिर आमनुल्ला शेख, यांच्या प्रमुख उपस्थितीत ह.भ.प.रामकृष्ण रंधवे महाराज, यांच्या हस्ते लोकसेवा हॉस्पिटलचे उद्घाटन करण्यात आले.यावेळी जि.प.सदस्य माऊली आप्पा जरांगे, गटनेते बळीराम पोटे, नगरपंचायत उपाध्यक्ष रोहीदास गिते, नय्युम पठाण,सभापती रामेश्वर गोरे,महादेव जाधव,आसेफ सौदागर ,सुनील वाघमारे,श्रीहरी गिते पाटील, संदीप शिंदे, सोमिनाथ कोल्हे ,महेश बेदरे,डॉ.संजय कौठेकर, डॉ.मोहम्मद एजाज, डॉ.वल्लब आंधळे, डॉ.अभिजित गायकवाड, डॉ.केदार सेवक, डॉ.गंगासागर भोसले, डॉ.कल्याण पोकळे ,अड.जब्बार पठाण ,डॉ.शिवप्रसाद करडे,सह अनेक मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमांचे बहारदार सुत्रसंचलन सय्यद सज्जाद यांनी केले तर आभार नगरसेवक रामेश्वर गोरे यांनी मानले.

# पत्रकारांची कृषी सफर ; फळबागेची पाहणी

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील काकड्याची किन्ही येथे सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे यांच्या पाच एकरातील १ हजार ५०० संत्रा झांडाची पाहाणी व स्नेहभोजन सोहळा आज मळ्यात झाला.यावेळी आष्टी तालुका पत्रकार संघाचे सर्वची सर्व सर्व १३ सदस्य उपस्थित होते.जेष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे,उत्तम बोडखे,दत्ताभाऊ काकडे,प्रा. डा.विनोद ढोबळे,प्रविण पोकळे,भीमराव गुरव,रघुनाथ कर्डीले,संतोष सानप,शरद तळेकर,गणेश दळवी, शरद रेडेकर,सचिन रानडे,मनोज पोकळे हे उपस्थित होते.



**आष्टी तालुक्यात फळबागेकडे शेतकऱ्यांचा**

महाशिवरात्रीच्या पुर्वसंध्येला हे शुध्द शाकाहारी स्नेहभोजन झाले. अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा भाग असलेल्या शेती व्यवसायामध्ये मोठ्या प्रमाणावर आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रगती होत असतानाच आष्टी तालुक्यातील विविध ठिकाणी शेतकऱ्यांनी फळबागाचा प्रयोग केला आहे.त्याला बऱ्यापैकी यश येत आहे.अशाच एका फळबागेला आष्टी तालुका पत्रकार संघाच्या सदस्यांनी आज मंगळवारी भेट दिली.

शिवरात्र आजच झाली मग तुमची आष्टी तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणावर शेती क्षेत्रावर पश्चिम आणि दक्षिण आणि उत्तर दिशेला आहे.शेती क्षेत्र विस्तारलेले आहे.काही ठिकाणी सिंचन सुविधा आहेत तर बऱ्याच शेती क्षेत्राला पाण्याविना कोरडवाहू पिके घेणे वाचून पर्याय नाही.अशा स्थितीमध्ये आष्टी तालुक्यातील किन्ही गावांमधील शेतीनिष्ठ शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत आणि कृषी क्षेत्रातील अधिकाऱ्यांच्या ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

बुधवार, दि.२६ फेब्रुवारी २०२५ । पान ७

# पुणे महानगरपालिका हद्दीतील थकीत मिळकत धारकांसाठी ‘अभय योजना’ लागू करावी

पुणे । प्रतिनिधी

पुणे महानगरपालिका हद्दीतील थकीत मिळकतधारकांना दिलासा देण्यासाठी ‘अभय योजना’ लागू करण्याची मागणी राज्य शासनाकडे करण्यात आली आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांची मुंबई येथे भेट घेऊन या मागणीसंदर्भात आमदार बापुसाहेब पठारे यांच्यातर्फे निवेदन सादर करण्यात आले.

मुंबई येथे मंगळवारी (दि. २५) आमदार बापूसाहेब पठारे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची मंत्रालयात भेट घेतली. भेटीदरम्यान, पुणे महापालिका हद्दीतील थकित मिळकतधारकांसाठी अभय योजना लागू करण्यासंदर्भात विस्तृत चर्चा झाली. अजित



## आमदार बापूसाहेब पठारे यांची मागणी

पवार यांनी संबंधित मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे समजते.

पुणे महानगरपालिका हद्दीतील मिळकतधारकांनी गेल्या अनेक वर्षापासून विविध कारणांमुळे मिळकतकर भरला नाही, त्यामुळे त्यांच्यावर मोठ्या प्रमाणात व्याज व दंड आकारला जात आहे. त्यामुळे थकबाकीची रक्कम मोठ्या प्रमाणावर थकीत असून नागरिक ती भरण्यास तयार नसल्याचे निदर्शनास येत आहे. यामुळे महापालिकेला कर संकलन करण्यास अडचणी निर्माण होत आहे. या करामुळे थकीत मिळकतधारक नागरिकांचे मोठे आर्थिक नुकसान होवू शकते. त्यामुळे थकीत करदात्याला न्याय देण्यासंबंधी शासनाने ‘अभय योजना’ आणल्यास गोर- गरीब नागरिक संबंधित योजनेच्या माध्यमातून मिळकत कर भरतील व त्यामुळे महापालिकेलाही जास्तीत- जास्त कर संकलन प्राप्त होण्यास मदत होईल असे, असे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

या संदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी सविस्तर आणि सकारात्मक चर्चा झाली असून, लवकरच या मागणीवर योग्य पाऊल उचलले जातील, असे आश्वासन त्यांनी दिले. तसेच, या मागणीचे निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही सुपूर्द करण्यात आले आहे. त्यामुळे लवकरच या योजनेला राज्य शासनाची मंजुरी मिळण्याची अपेक्षा आहे असे आमदार बापूसाहेब पठारे म्हणाले.

# बारामतीत ग्रामदैवत श्रीसिद्धेश्वर मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त महोत्सवाचे आयोजन

बारामती । प्रतिनिधी

बारामतीचे ग्रामदैवत श्रीसिद्धेश्वर मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त भव्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. कर्हा नदीच्या उगमस्थानापासून संगमापर्यंत १२ ज्योतिर्लिंग आहेत. त्यापैकी एक असे बारामतीचे ग्रामदैवत सिद्धेश्वर देवस्थान प्रसिद्ध आहे. या मंदिराला ७८६ वर्षे पूर्ण झाली आहेत. यादवकाळातील हेमाडपंती बांधणीचे अतिशय सुंदर, घडीव आणि अप्रतिम शिल्पकामाने सजविलेले हे मंदिर आहे. मंदिरामधील नंदी अतिशय देखणा, दगडी कोरीव काम असा आकर्षक आहे.

इतिहासातील उल्लेखांनुसार सिद्धेश्वर मंदिराचे बांधकाम इसवी सन ११४७ मध्ये राजा रामदेवराय यादव यांनी सुरू केले. सन १२३७ मध्ये ते पूर्ण झाले. सुमारे नव्वदवर्षे हे बांधकाम सुरू होते. अखंड लिंग व अखंड दगडात कोरलेला सुंदर नंदी या मंदिराचे वैशिष्ट्य आहे. या मंदिराच्या कळसाखाली ध्यानधारणा करण्यासाठी जागा आहे. तिथे एक महादेवाची पिंड होती. मंदिराच्या दुसर्या सभामंडपात कासवाखाली नक्षिकाम करण्यात आले आहे.उत्तम स्थापत्यशैली आणि शिल्पकाम असलेल्या या मंदिराला संत ज्ञानेश्वर माउली, जगद्गुरू संत श्रीतुकाराम महाराज, महाराज श्रीशहाजीराजे, छत्रपती श्रीशिवाजी महाराज, छत्रपती श्रीसंभाजी महाराज यांच्यापासून कविवर्य मोरोपंत यांच्यापर्यंत अनेक थोरामोठ्यांनी त्याकाळी भेट दिली असून, हे मंदिर बारामतीच्या वैभवशाली वारसापरंपरेचे साक्षीदार आहे.


शिवकालानंतर पहिले बाजीराव पेशवे यांनी पांडुरंग दाते यांच्याकडे या मंदिराची व्यवस्था सोपवली. तेव्हापासून आजपर्यंत दाते कुटुंब सिद्धेश्वराची दैनंदिन व्यवस्था पाहतात. दाते यांची



सध्या बारावी पिढी देवाची सेवा करते. मंदिराच्या इतिहासाबद्दल पेशवे बाळाजी विश्वनाथ भट यांनी इसवी सन १७२३ मध्ये मोडी भाषेत एक सनद लिहून ठेवली होती, जी आजही दाते यांच्याकडे आहे. संत ज्ञानेश्वर माउलींनी येथे गणपतीची मूर्ती स्थापन केली.कविवर्य मोरोपंत व श्रीधर स्वामी यांनी मंदिराच्या आवारात बसून लेखन केले आहे. जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या पालखीचा मुक्काम याच मंदिरात पूर्वी होता. दरवर्षी महाशिवरात्रीनिमित्त मोठा महोत्सव आयोजित केला जातो व विविध कीर्तनकार यांना या ठिकाणी आमंत्रित केले जाते. दर्शनासाठी विविध भागांतून भाविक येत असतात.

# पिंपळवंडी येथील तरुण दुचाकीच्या अपघातात ठार

पिंपळवंडी - कल्याण- अहिल्यानगर महामार्गावर सोमवारी (ता. २५) रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास झालेल्या अपघातात पिंपळवंडी (ता. जुन्नर) येथील राजेश रमेश काकडे (वय-३२) हा तरुण मृत्युमुखी पडला.



राजेश हा त्याच्या स्वतःच्या दुचाकीवरून आळेफाट्यावरून ओतुरच्या दिशेने जात असताना पिंपरी पेंढार गावच्या हद्दीत आला असता रस्त्याचा अंदाज न आल्याने समोरून आलेल्या कारला धडकला. धडक जोरात बसल्याने राजेशचा जागीच मृत्यु झाला.

अपघाताची माहिती समजल्यानंतर ओतुर पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी यांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला. कल्याण अहिल्यानगर या महामार्गावर सिमेंट रस्त्याचे काम सुरु असल्याने वाहतुकीसाठी हा महामार्ग धोकादायक ठरत आहे. कमी जागेतून एकेरी दोन्ही बाजूने वाहतूक होत असल्याने अपघात होत असुन लवकरात लवकर या रस्त्याचे काम पुर्ण व्हावे अशी मागणी नागरिक करत आहेत. या पुर्वी सुद्धा या रस्त्याच्या कामामुळे सर्वसामान्य नागरिकांचे मृत्यु येथे झालेले आहेत. पिंपळवंडी येथे शोकाकुल वातावरणात राजेशवर अंत्यसंस्कार करण्यात आले.राजेशच्या पश्चात पत्नी, आई, वडील, बहीण असा परिवार आहे. पिंपळवंडी गावचे ग्रामपंचायत सदस्य नितेश काकडे यांनी ओतूर पोलीस स्टेशन मध्ये फिर्याद दाखल केली.

# पुणे-नाशिक नव्या रेल्वे मार्गाला विरोध कायम; लढा तीव्र होणार, समिती गठित करणार: सत्यजीत ताबे यांची माहिती

पुणे । प्रतिनिधी

पुणे- नाशिक सेमीहाय स्पीड रेल्वेच्या जुन्या मार्गात जीएमआरटीचा महाकाय दुर्बिणीचा प्रकल्प अडथळा ठरत होता. यामुळे प्रकल्पाला कोणताही धक्का न लावता हा प्रकल्प वगळून नवीन मार्ग करण्याचा निर्णय केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पुण्यात भेट देत घेतला. त्यामुळे पुणे-नाशिक रेल्वे मार्गात संगमनेर येणार नाही.

तर पुण्यावरुन अहिल्यानगर, शिर्डीमार्गे नाशिककडे असा पर्यायी मार्ग निश्चित करण्यात आला आहे. मात्र, या निर्णयाला विधान परिषदेचे आमदार सत्यजीत तांबे यांनी आक्षेप घेतला असून जुन्याच मार्गानुसारच हा प्रकल्प पूर्ण करण्याची मागणी केली होती. तसे न झाल्यास आगामी



काळात सर्वपक्षीय नेत्यांचा लढा उभारणार असल्याचे त्यांनी जाहीर केले होते.

त्यानुसार आता ३ मार्चपासून सुरू होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी यासाठी सर्वपक्षीय नेत्यांची बैठक घेणार असल्याचे तांबे यांनी सांगितले आहे. याविषयीची पोस्ट त्यांनी त्यांच्या एक्स अकाउंटवरून शेअर केली आहे.

पुणे-नाशिक रेल्वेसाठी सर्वपक्षीय लढ्यासाठी ३ मार्चपासून सुरुवात होणार. मुंबईत होणार सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींची पहिली बैठक ! यापूर्वी मी १ मार्च २०२४ रोजी पुणे-नाशिक सेमी हाय-स्पीड रेल्वे प्रकल्पासंदर्भात या मार्गावर येणाऱ्या सिन्नर, संगमनेर, नारायणगाव, मंचर, राजगुरुनगर, चाकण आणि पुणे या भागांतील लोकप्रतिनिधींना प्रत्यक्ष भेटून निवेदन दिले होते, असे त्यांनी त्यांच्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

यासंदर्भात आज पुन्हा मी सर्व मा. आमदार आणि मा. खासदारांना स्वतः फोन करून आणि पत्र पाठवून मुंबईत ३ मार्चपासून सुरु होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी बैठकीस येण्याचे आमंत्रण दिले आहे, असे त्यांनी पोस्ट केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे. आम्ही सर्वजण आंतरिक राजकीय मतभेद विसरून विकासाच्या दृष्टीने सकारात्मकपणे एकत्र येणार असून कृती समिती स्थापन करण्याच्या दृष्टीने आम्ही सविस्तर चर्चा करणार आहोत, असे देखील त्यांनी या पोस्टमध्ये म्हटले आहे.आ. दिलीप वळसे पाटील (आंबेगाव-शिरूर विधानसभा), आ. माणिकराव कोकाटे (सिन्नर विधानसभा), आ. शरद सोनवणे (जुन्नर विधानसभा), आ. अमोल खताळ (संगमनेर विधानसभा), आ. बाबाजी काळे (खेड-आळंदी विधानसभा), खासदार राजाभाऊ वाजे (नाशिक लोकसभा), खासदार भाऊसाहेब वाकचौरे (शिर्डी लोकसभा), खासदार डॉ. अमोल कोल्हे (शिरूर लोकसभा) यांची नाव देखील लिहिली आहेत.

# खराडी परिसरात शुक्रवारी पाणीपुरवठा बंद

पुणे : महापालिकेकडून येत्या शुक्रवारी ( दि. २८) रोजी चंदननगर टाकीच्या मुख्य जलवाहिनीवर तातडीचे व अत्यावश्यक स्वरूपाचे दुरुस्तीचे काम समान पाणीपुरवठा विभागाकडून घेण्यात येणार आहे.

या दिवशी संपूर्ण खराडी परिसरातील बहुतांश भागाचा पाणी पुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे. तर दुसऱ्या दिवशी सकाळी कमी दाबाने आणि उशीरा पाणी पुरवठा सुरळीत केला जाणार असून नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन महापालिका प्रशासनाकडून करण्यात आले आहे.पाणी पुरवठा बंद असणारा भागः- संपूर्ण खराडी, चंदननगर, वडगावशेरी मधील आनंदपार्क, सुनीता नगर, गणेश नगर, स्वामी समर्थ, नामदेव नगर, मते नगर, पुण्य नगरी, महावीर नगर, मुन्नवार सोसायटी, माळवाडी आणि परिसर..

# कालव्यात कार कोसळली, तरुण बेपत्ता

मंचर । प्रतिनिधी

वळणावर चालकाचा ताबा सुटल्याने कार हुतात्मा बाबू गेनू सागराच्या (डिंभे धरण) डावा कालव्यात पडली. या कारमधील एक जण सुखरूप बाहेर आला, तर दुसरा तरुण बेपत्ता झाला आहे. चास-ठाकरवाडी (ता. आंबेगाव) येथील कोंबडवाडी हद्दीत रविवारी (दि. २३) रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. वैभव मोरे (वय २८) असे बेपत्ता झालेल्या तरुणाचे नाव आहे. तर प्रवीण घाणेकर (वय २३) हा या अपघातातून बचावला आहे. नारोडी येथून वैभव व प्रवीण हे दोघे कार मधून जात होते. वैभव कार चालवित होता.

चास गाव पार केल्यानंतर ठाकरवाडी रस्त्याने गिरवलीकडे जात असताना कोंबडवाडी हद्दीत वळणावर वैभवचा कारवरील ताबा सुटल्याने कार थेट डिंभे धरणाच्या डाव्या कालव्यात कोसळली. या



वेळी प्रवीण कारमधून बाहेर आला. मात्र वैभव बाहेर आला नाही. प्रवीणने मदतीसाठी जवळच असलेल्या बंगल्याकडे धाव घेत घटनेची माहिती दिली. गणेश ज्ञानेश्वर बारवे, राजेश रोहिदास बारवे, विपूल ज्ञानेश्वर बारवे, रोहित हरिचंद्र बारवे, ठकसेन किसन गुंड व संकेत ठकसेन गुंड आदी तरुणांनी कालव्यातून कार बाहेर काढली. त्यासाठी सत्यवान पोपट बारवे यांनी ट्रॅक्टर उपलब्ध करून दिला. परंतु वैभव मिळून आला नाही. त्याचा परिसरात शोध घेतला, पण त्याचा शोध लागला नाही. प्रवीणने वैभव बेपत्ता झाल्याची फिर्याद घोडेगाव पोलिस ठाण्यात दिली आहे.

कालवा पूर्ण क्षमतेने भरून वाहत असल्याने शोधकार्यात अडथळे येत होते. त्यामुळे जलसंपदा विभागाचे वरिष्ठ अधिकारी दत्ता कोकणे यांनी कालव्यातील पाणी बंद केले. दरम्यान घोडेगाव पोलिसांना रवींद्र जगन्नाथ चासकर आणि पोलिस पाटील वैभव शेगर पाटील यांनी माहिती दिली. त्यानुसार सहायक पोलिस निरीक्षक किरण भालेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हवालदार समीर कांबळे, नामदेव डेंगळे व माणिक मुळूक यांनी घटनास्थळी दाखल होत पाहणी केली. वैभवचे मूळगाव नारोडी (ता. आंबेगाव) असून, तो सध्या मुंबई येथे राहत होता. त्याचा दादर येथे कॅन्टीनचा व्यवसाय आहे. त्याचा रविवारी (दि. ९) साखरपुडा झाला होता. सोमवारी (दि. २४) विवाहाची तारीख ठरवली जाणार होती.

# गजा मारणेला तीन मार्चपर्यंत पोलिस कोठडी

पुणे - कोथरूड परिसरात एका आयटी अभियंता तरुणाला मारहाण केल्याप्रकरणी गुंड गजानन ऊर्फ गजा मारणे याला न्यायालयाने तीन मार्चपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. पोलिसांनी गजा मारणेसह सहा जणांविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मकोका) कारवाई केली आहे.

कोथरूडमधील आयटी अभियंता तरुण १९ फेब्रुवारी रोजी दुपारी दुचाकीवर घरी निघाला होता. त्यावेळी गाडीचा धक्का लागल्याच्या कारणावरून चौघांनी तरुणाला बेदम मारहाण केली होती. याबाबत कोथरूड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.



पोलिसांनी ओम तीर्थराम धर्मजिज्ञासू (वय-३५), किरण कोंडिबा पडवळ (वय-३१) अमोल विनायक तापकीर (वय-३५, तिघे रा. शास्त्रीनगर, कोथरूड) यांना अटक केली होती. हे तिघेजण न्यायालयीन कोठडीत आहेत. तर श्रीकांत संभाजी पवार (रा. वडगाव रासाई, ता. शिरूर) पसार आहे.या प्रकरणात पोलिसांनी सोमवारी (ता. २४) या चौघा आरोपींसह टोळीप्रमुख गजानन मारणे, रूपेश मारणे याच्यावर मकोका कायद्यान्वये कारवाई केली. पोलिसांनी गजा मारणेला सोमवारी अटक केली होती. त्याला मंगळवारी न्यायालयात हजर करण्यात आले.

फरार आरोपींचा शोध घेण्यात येत असून, आरोपींच्या बेकायदेशीर मालमत्तेची चौकशी करण्यात येणार आहे. त्यासाठी आरोपी गजा मारणेला १४ दिवसांची पोलिस कोठडी देण्याची मागणी पोलिसांनी केली. त्यावर न्यायालयाने आरोपी मारणेला सात दिवसांची पोलिस कोठडी सुनावली.

# मालमत्ताकर भरल्याशिवाय वेतन नाही; महापालिका प्रशासनाचे अधिकारी, कर्मचाऱ्यांना आदेश

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी-चिंचवड महापालिकेत दहा हजारांपेक्षा अधिक अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. त्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींच्या नावे असलेल्या मालमत्तेचा मालमत्ताकर २८ फेब्रुवारीपर्यंत जमा करण्याचे आदेश महापालिकेने काढले आहेत. मालमत्ताकर न भरणार्या अधिकारी व कर्मचार्यांचे मार्च महिन्याचे वेतन काढले जाणार नाही, असे अधिकार्यांनी स्पष्ट केले आहे.



महापालिकेच्या करसंकलन विभागाकडून मालमत्ताकर वसुलीची मोहीम तीव्र करण्यात आली आहे. थकबाकीदारांच्या मालमत्ता सील लावून जप्त करण्यात आल्या आहेत. तब्बल ८५० मालमत्ता आत्तापर्यंत सील करण्यात आल्या आहेत. त्यात सर्वाधिक मालमत्ता या बिगरनिवासी आहेत. तर, ४३८ मालमत्तांचा लिलाव करण्यात येत आहे. त्या माध्यमातून मालमत्ताकराची वसुली वाढविण्यावर भर देण्यात आला आहे.

महापालिकेचे बहुतांश अधिकारी व कर्मचारी हे पिंपरी-चिंचवड शहरात राहतात. त्यांच्या व त्यांच्या कुटुंबातील व्यक्तीच्या नावे शहरात मालमत्ता आहेत. त्यामुळे त्यांनाही मालमत्ताकर भरण्याची सक्ती करण्यात आली आहे.

महापालिका आस्थापनावरील तसेच, कंत्राटी, हंगामी, मानधनावरील अधिकारी व कर्मचार्यांना २८ फेब्रुवारीपर्यंत मालमत्ताकर भरणे सक्तीचे करण्यात आले आहे. तसेच, कुटुंबातील व्यक्तीच्या नावे मालमत्ता असल्यास कर भरण्याची सक्ती करण्यात आली आहे. कर भरल्याची पावती आपल्या विभागातील आस्थापना लिपिकाकडे सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.शहरात मालमत्ता नसल्यास तसे प्रमाणपत्र अधिकारी व कर्मचार्यांना द्यावे लागणार आहे. मालमत्ताकराचे बिल न भरल्यास त्याचे मार्च २०२५ महिन्याचे वेतन अदा करण्यात येणार नाही, असे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी काढलेल्या आदेशात नमूद केले आहे.

# शिरुर न्यायालयाने ‘त्या’ प्रकरणी डॉक्टर आरोपीस ठोठावली २ वर्षांच्या कारावासाची शिक्षा

शिरुर । प्रतिनिधी

न्हावरे (ता.शिरुर) गावच्या हददीत नाथकृपा हॉस्पिटल मध्ये दिनांक ९ ऑगस्ट २०२० रोजी रात्री १०:०० वाजण्याच्या सुमारास आरोपी डॉ. रामहरी भुजंगराव लाड (रा.न्हावरे, ता.शिरुर,जि. पुणे) यांच्या हॉस्पिटलमध्ये एक महिला उपचार घेत असताना आरोपी डॉ.रामहरी भुजंगराव लाड याने फिर्यादी महिलेस हॉस्पिटलच्या ओपीडीमध्ये बोलावुन घेवुन फिर्यादीचे अंगाशी लगड करून मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करुन तसेच फिर्यादी सोबत अश्लिल बोलुन फिर्यादीस लज्जा वाटेल असे वर्तन केले होते.

या प्रकाराबाबत शिरुर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हाचा तपास पोलीस उपनिरीक्षक एस. एन. मोटे यांनी पुर्ण करुन आरोपीविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. सदर गुन्हयाचा खटला शिरुर येथील प्रथमवर्ग



न्यायदंडाधिकारी जे. ए. झारी यांच्या न्यायालयात सुरु होता.

यात सरकारच्या वतीने सहायक सरकारी अभियोक्ता माया शिवाजी क्षीरसागर (जाधव) यांनी युक्तीवाद केला असुन वरील प्रकरणामध्ये सबळ साक्षी पुराव्याअंती शिरुर प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी जे. ए. झारी यांनी आरोपीस दिनांक २१ फेब्रुवारी २०२५ रोजी भारतीय दंड विधान सहिता कलम ३५४ मध्ये दोन वर्ष व भारतीय दंड विधान संहिता कायदा कलम ३५४ (अ) मध्ये दोन वर्ष कारावास दोन्ही शिक्षा एकत्र भोगावयाच्या आहेत. तसेच ३० हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली आहे.सरकारी पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता माया शिवाजी क्षीरसागर (जाधव), पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली कोर्ट पैरवी म्हणुन पोलीस हवालदार तुकाराम गोरे, महिला पोलीस अंमलदार मनिषा फंड, तसेच वॉरंट व समन्सबाबत पोलीस हवालदार बाळकृष्ण वाडेकर व पोलीस अंमलदार प्रकाश वाघमारे यांनी कामकाज पाहिले होते

# पिंपरी पेंढार येथे शिवजयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

पिंपळवंडी, : पिंपरी पेंढार सोशल यूथ फाउंडेशन, शिवजन्मोत्सव कमिटी आणि ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षीप्रमाणे शिवजयंती उत्सव पिंपरी पेंढार (ता. जुन्नर) येथे जल्लोषात साजरा करण्यात आला. या वेळी प्रभात फेरी, शोभायात्रा, वक्तृत्व स्पर्धा, व्याख्यान, महाप्रसाद आदी कार्यक्रमांचे आयोजन केले होते.

शिवजयंतीच्या पूर्वसंध्येपासून (ता. १८) किल्ले शिवनेरी येथून राज्याच्या विविध भागात शिवज्योत घेऊन जाणाऱ्या शिवभक्तांचे स्वागत करण्यात आले. सर्व शिवभक्तांना



अल्पोपाहार आणि पाणी वाटप करण्यात आले. शिवजयंतीदिनी सकाळी शालेय विद्यार्थ्यांच्या सहभागातून प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले. यात शिवाजी महाराजांच्या जयघोष करण्यात आला. सर्व विद्यार्थी आणि ग्रामस्थांसाठी अल्पोपाहाराची व्यवस्था करण्यात आली.दुपारनंतर भव्य शोभायात्रा काढून शिवछत्रपतींना अभिवादन करण्यात आले. ‘डीजे’रहित शोभायात्रेमध्ये महिला भगिनींनी महिलांच्या लेझीम पथकाने रंगत भरली. घोड्यावरून आणि रथामध्ये विराजमान झालेले बाल शिवाजी, तसेच मावळे सर्वांच्याच आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरले. शोभायात्रा संपन्न झाल्यानंतर शालेय विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेतील विजेत्यांना चषक देऊन गौरविण्यात आले. या वेळी प्रवीण महाराज सोनवणे यांचे व्याख्यान झाले.